सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ५८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २२ मार्च २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## ....तर हल्लेखोरांची संपत्ती जप्त करणार : मुख्यमंत्री

### नागपुरातील हिंसाचाराचा पहिला बळी, जखमीचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २२ मुंबई**

सोमवारी दोन गटांत नागपुरात उफाळलेल्या हिंसाचारात जखमी झालेल्या युवकाचा आज मृत्यू झाला आहे. दरम्यान, याप्रकरणी आज मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरच्या पोलीस आयुक्तांबरोबर बैठक घेऊन काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. या निर्णयाबाबत त्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, घटनेच्या अनुषंगाने आज नागपूरचे पोलीस आयुक्त, एसपी आणि सर्व वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत आढावा घेतला. एकूण घटनाक्रम आणि त्यानंतर केलेली कारवाई या सर्व गोष्टींसदर्भातील ही आढावा बैठक होती. यासंदर्भात



मुळातच काही गोष्टी सभागृहात स्पष्ट केल्या होत्या. औरंगजेबाची प्रतिकात्मक कबर सकाळी जाळण्यात आली, त्यानंतर काही लोकांनी तक्रार केली. पोलिसांनी तक्रार दाखल करून घेतली. मात्र, प्रतिकात्मक कबर जाळत असताना कुराणच्या आयत लिहिलेली चादर जळाली, अशाप्रकराचा एक भ्रम तयार करून काही लोकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून एक अपप्रचार केला आणि त्यानंतर मोठ्या प्रमाणात जमाव तायर झाला.

**नागपूर दंगलीप्रकरणी ९२ लोकांना अटक**

जमावाने तोडफोड केली, गाड्या फोडल्या, लोकांवर हल्ला केला. पोलिसांनी जवळपास ४-५ तासांत या संपूर्ण दंगलीवर आवर घातला. त्याकरता अश्रूधुराच्या नळकांड्या आणि इतर प्रकारच्या प्रतिबंधात्मक पोलिसांनी केल्या. सीसीटीव्ही फुटेज, मोबाईलवरील चित्रिकरण, पत्रकारांनी केलेले चित्रिकरण यात जे दंगेखोर दिसत आहेत, त्यांच्यावर अटक करण्याची कारवाई पोलिसांनी सुरू केली आहे. १०४ लोकांना ओळखण्यात आले असून ९२ लोकांना अटक केली असून काही लहान बालकांवरही कारवाई सुरू आहे, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

जो जो व्यक्ती दंगा करताना दिसतोय, दंगेखोरांना मदत करताना दिसतोय, अशा प्रत्येकावर कारवाई करण्याची मानसिकता पोलिसांची आहे. त्यादृष्टीने पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. सोशल मीडियाचं ट्रॅकिंग करून ही घटना घडावी म्हणून पोस्ट ज्यांनी केलीय त्या सर्वांना दंगेखोरांसोबत सहआरोपी केलं जाणार आहे. जवळपास ६८ पोस्ट ओळखण्यात आल्या असून डिलिट केल्या आहेत. अजून काही पोस्टची माहिती घेणं चालू आहे.. भडकवणारे पॉस्टकास्ट, चुकीच्या पोस्ट टाकून अफवा पसरवून लोकांमध्ये भीती निर्माण केलेल्या लोकांवर कारवाई केली जाईल, असंही ते म्हणाले.

**दंगा करण्याचा प्रयत्न केला तर**

काही निर्बंध घातले आहेत, त्या निर्बंधांमुळे जनजीवनावर परिणाम होतोय, व्यापारावर परिणाम होतोय. त्यात शिथिलता आणावी हा प्रयत्न आहे. यामुळे पोलीस सजग राहणार आहेत. कोणी दंगा करण्याचा प्रयत्न केला तर अतिशय कडक कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

## दिशा सालियन प्रकरणात नारायण राणेंचा मोठा गौप्यस्फोट म्हणाले उद्धव ठाकरेंचे दोन फोन आले अन्......

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २२ मुंबई**

दिशा सालियनच्या वडिलांनी मुंबई हाय कोर्टात याचिका दाखल केली आहे, त्यामुळे पुन्हा एकदा पाच वर्षांनंतर हे प्रकरण चर्चेत आलं आहे. या याचिकेत शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्यावर देखील आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर आता भाजप नेते नारायण राणे यांनी पत्रकार परिषद घेऊन मोठा गौप्यस्फोट केला आहे. उद्धव ठाकरे यांचे आपल्याला दोन फोन आल्याचा दावा राणे यांनी केला आहे.



त्यावेळी ही घटना घडली तेव्हा मी मुंबईवरून घरी चाललो होतो, तेवढ्यात वांद्रे क्रॉस केल्यावर फोन आला. मिलिंद नार्वेकरचा फोन होता. म्हणाले, दादा साहेबांना तुमच्याशी बोलायचं आहे. मी म्हटलं, कोण साहेब. म्हणाले, उद्धवजी, त्यांच्याबरोबर मी आहे. ते गाडी चालवत आहेत. त्यांना बोलायचं आहे. मी म्हटलं, द्या.

त्यांनी फोन घेतल्यावर मी म्हटलं जय महाराष्ट्र साहेब, बोला, ते म्हणाले, तुम्ही अजून जय महाराष्ट्र बोलता. मी म्हटलं, मरेपर्यंत बोलणार. हे माझं उत्तर लगेच. तुम्हाला माहीत आहे मी थांबत नाही.

उद्धव ठाकरे म्हणाले, नाही साहेब मला हे बोलायचंय तुम्हाला मुलं आहेत. मलाही मुलं आहेत. सध्या तुम्ही जे काही प्रेसला बोलता. आदित्यचं नाव घेता. माझी विनंती आहे की तुम्ही त्याचा उल्लेख करू नये. असं वाटतं म्हणून विनंती करायला फोन केला. मी म्हटलं, उद्धवजी एक गोष्ट लक्षात ठेवा. एक तर मी अमूक ठिकाणी, अमूक याच्यात कोण आहे याचा उल्लेख केला नाही. निरपराध एका मुलीची अत्याचार करून हत्या झाली हे म्हणतोय. आरोपींना अटक झाली पाहिजे हे म्हणतोय. त्यात तडजोड नाही. फक्त तुम्ही तुमच्या मुलाचं नाव घेतलं, त्याला संध्याकाळी जिथे जातो, तिथं जाण्यापासून सांभाळा. सांगा त्याला हे बरं नाही. माझ्या घराच्या समोर तो डिनो मोरिया राहतो. तिथे हे लोक जमतात आणि काय साडे तीन चार तास धुमाकूळ घालतात. मला माहीत नाही. मला माहीत आहे, पण तुम्हाला सांगणार नाही. म्हणून मी सांगितलं तुम्ही त्यांना सांभाळा. उद्धव ठाकरे म्हणाले, साहेब मी पाहतो, सांगतो. पण तुम्ही तेवढं सहकार्य करा. मी म्हणालो, ठिक आहे. अन् त्यांनी फोन ठेवला, असं राणे यांनी म्हटलं आहे.

## 'मी स्वत: एसएससी बोर्डाच्या शाळेत शिकले', सीबीएसई बोर्डाच्या निर्णयावर सुप्रिया सुळेंची टीका; म्हणाल्या, शिक्षक आहेत का?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २२ मुंबई**

केंद्र सरकारने एकाबाजूला मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला. तर दुसऱ्या बाजूला आता एसएससी बोर्डाला हद्दपार करून मराठी भाषेची गळचेपी सुरू केली आहे, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणल्यानतंर आम्ही त्याचे स्वागत केले होते, पण याच्या माध्यमातून आमच्या मराठी शाळांना बंद पाडत आहात, असाही सवाल त्यांनी उपस्थित केला.

सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या, एकाबाजूला देशात आंतरराष्ट्रीय बोर्डाच्या शाळांची संख्या वाढत आहे. आंतरराष्ट्रीय बोर्डांना सरकार लाल गालीचा अंथरत आहे. दुसरीकडे राज्य सरकारच्या मराठी माध्यमाच्या शाळा बंद पाडत आहे. याबाबत मी शिक्षण मत्री दादा भुसे यांना पत्र लिहून जाब विचारला आहे.

**माझे शिक्षण एसएससी बोर्डातूनच**

मी एक आई आणि त्याचबरोबर लोकप्रतिनिधीही आहे. मी स्वत: एसएससी बोर्डाच्या शाळेत शिकली आहे. पालकांकडे पर्याय असला पाहिजे, असे माझे मत आहे. पालकांना सीबीएसई,




आयसीएसई, एसएससी असे कोणतेही बोर्ड निवडायची मुभा असली पाहिजे. एसएससी बोर्डाची काय चूक आहे?, असा सवाल सुप्रिया सुळेंनी विचारला आहे.

**सीबीएसई बोर्डासाठी सुविधा आहेत का?**

सरकार जर सीबीएसई बोर्ड आणणार असेल तर त्यासाठी त्यांची तयारी आहे का? तुमच्याकडे तो अभ्यासक्रम शिकवणारे शिक्षक आहेत का? मागच्या आठवड्यातच राज्यातील एका शिक्षकाने आत्महत्या केली आहे. एका बाजूला शेतकरी, शिक्षक आत्महत्या करत आहेत आणि सरकारचे मात्र भलतेच काहीतरी सुरू आहे. जे आहे, त्यासाठी सरकारकडे खर्च करायला पैसे नाहीत, मग नवी टुम का काढली जात आहे?, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

**मराठी भाषेचे भवितव्य काय?**

सीबीएसई बोर्डाच्या शाळेत मराठी भाषेचे काय होणार? राज्याचा इतिहास शिकविला जाणार की नाही? मराठी कविता, मराठी लेखकांचे धडे या बोर्डात असणार का? आज शाळांमध्ये वीज, पाणी अशा मूलभूत सुविधा नाहीत. शिक्षकांचे पगार वेळेवर होत नाहीत. त्यात सीबीएसई मध्येच का आणले जात आहे?, असे काही प्रश्न सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केले.

## त्याला अध्यक्ष करायच्या आधी माझा राजीनामा घ्या नितीन गडकरींनी सांगितला मुलाबद्दलचा किस्सा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २२ अमरावती**

'माझ्या मुलाला युवा मोर्चाचा अध्यक्ष करायचं आहे. असे एकदा मला प्रवीण दटके यांनी विचारलं होतं. त्यावर मी त्यांना म्हणालो की, त्याला अध्यक्ष करण्याच्या आधी माझा राजीनामा घेऊन टाका.' हे विधान आहे केंद्रीय नितीन गडकरी यांचे! अमरावतीमध्ये एका कार्यक्रमात त्यांनी त्यांची मुले राजकारणात नसल्याबद्दलचा किस्सा सांगितला.

अमरावतीलमधील श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख स्मृती



पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी त्यांनी मनोगत व्यक्त करताना राजकारणाबद्दल भाष्य केले.

**आधी माझा राजीनामा घेऊन टाका, असे गडकरी का म्हणाले?**

नितीन गडकरी मनोगत व्यक्त करताना म्हणाले, मी व्यावसायिक नाहीये. मला व्यवसायही करायचा नाही. मी जे काही केले, ती घाट्याची (तोट्यातील) कामे केली असतील, पण मुलांनी फायद्याची केली. माझी मुलं राजकारणात नाहीत. कारण मला... मी एकदा घरात विषय आल्यावर त्यांनी मला विचारलं... प्रवीण दटके आता आमदार आहेत. त्यांनी मला एकदा विचारलं की, तुमच्या मुलाला आता युवा मोर्चाचा अध्यक्ष करायचं आहे. मी म्हणालो चांगली गोष्ट आहे. त्याला अध्यक्ष करण्याच्या आधी माझा राजीनामा घेऊन टाका आणि मग त्याला करा. ते म्हणाले, तुम्ही असं कसं म्हणता. मी म्हणालो, मला मान्य नाही.

**ते काम माझ्या मुलाने करावे**

माझा मुलगा म्हणून त्याला राजकारणात स्थान मिळेल, हे नाही. त्याने आपल्या कर्तृत्वाने आपलं स्थान निर्माण करावं. मग त्याला तुम्ही घ्या. मी सायकल रिक्षातून उद्घोषणा केल्या. पोस्टर चिकटवले. आणि शून्यातून काम केले. त्याने ते काम करावं. माझा मुलगा म्हणून नाही, अशी भूमिका गडकरींनी यावेळी मांडली.

**आमदाराच्या पोटातून आमदार नाही झाला पाहिजे**

त्याला लोकांनी म्हणावं की हा पाहिजे. माझा मुलगा म्हणून तो पुढे बसले माझ्या हे नाही करायचं. आमदाराच्या पोटातून आमदार नाही झाला पाहिजे. खासदाराच्या पोटातून खासदार नाही झाला पाहिजे. त्याला अधिकार आहे, आमदार-खासदाराने म्हणायच्या ऐवजी जनतेने जर म्हटलं... कार्यकर्त्यांनी म्हटलं तर त्यांना अधिकार आहे. जे लोक आपलं कर्तृत्व सिद्ध करतात, त्यांना अधिकार आहे, असे गडकरी यावेळी राजकारणातील घराणेशाहीबद्दल बोलताना म्हणाले.

## अमरावती - यवतमाळ शिवशाही बस ला आग : जीवित हानी नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ माहुली चोर**

अमरावती वरून यवतमाळ कडे जाणारी शिवशाही बस आज दुपारी ४ वाजताच्या सुमारास माहुली (चोर ) या गावानजीक अचानक पेटल्याने काही वेळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती.मात्र सुदैवाने यात



कोणतीही जीवित हानी झाली नाही.

सध्या उन्हाळा तापू लागल्याने अनेक प्रवासी शिवशाही ने प्रवास करतात आज दुपारी बस क्रमांक एम एच ०६ बि डब्यु ०२९४ ही शिवशाही यवतमाळ कडे जात असताना अचानक पेट घेतला सध्या राज्यातील सर्वच शिवशाही या भंगार अवस्थेत आल्या आहेत.परिवहन विभागाचे या कडे साफ दुर्लक्ष आहे.मात्र दुसरा कोणता पर्याय नसल्याने प्रवास करतांना प्रवाशी शिवशाही ला पसंती देतात मात्र ही शिवशाही बस प्रवासात कधी धोका देईल याची काहीच गॅरंटी नाही.आज ही दुपारी माहुली चोर जवळ शिवशाही पेटली व अग्निशमन विभागाने ही आग आटोक्यात आणली मात्र तो पर्यंत शिवशाही बस जळून सम्पूर्ण कोळसा झाली होती.

## जयंत पाटील अस्वस्थ, त्यांना तिथे करमत नाही, भविष्यात पक्ष सोडतील हे नक्की; कुणी केला दावा?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २२ मुंबई**

बीड, परभणी प्रकरणावरून विरोधक चांगलेच आक्रमक झाले होते. महायुती सरकारला घेरण्याचा जोरदार प्रयत्न केला. यानंतर औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा पुढे आला. नागपूर येथे मोठा हिंसाचार झाला. यावरूनही विरोधकांनी सरकारवर जोरदार निशाणा साधला. यानंतर दिशा सालियान मृत्यू प्रकरणावरून राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप होताना पाहायला मिळत आहे. लाडकी बहीण योजना, शेतकरी कर्जमाफीवरूनही महायुतीवर विरोधक टीका करताना पाहायला मिळत आहेत. यातच अजित पवार आणि जयंत पाटील यांच्या भेटीमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना सुरुवात झाली आहे. यावर शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि मंत्री संजय शिरसाट यांनी मोठा दावा केला आहे.

वसंतदादा शुगर इन्स्टिटच्यूटच्या गव्हर्निंग कौन्सिलची बैठक झाली. ही बैठक शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्या बैठकीत शरद पवार-अजित पवार एकत्र असणार होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भेटण्यासाठी आणि त्यांना निवेदन देण्यासाठी गर्दी झाली होती. परंतु जयंत पाटील भेटण्यासाठी



आल्यावर अजित पवार यांच्या कक्षात असलेल्या सर्व लोकांना बाहेर काढण्यात आले. सुरक्षा रक्षकांनाही बाहेर काढण्यात आले. अजित पवार यांच्या स्वीय सहायकांनाही बाहेर जाण्यास सांगण्यात आले. त्यानंतर बंद दाराआड चर्चा झाली, असे सांगितले जात आहे. याबाबत संजय शिरसाट यांना प्रश्न विचारण्यात आला होता. यावर बोलताना संजय शिरसाट यांनी प्रतिक्रिया दिली.

मी अनेक वेळा सांगितले आहे की, जयंत पाटील तिथे अस्वस्थ आहेत, त्यांना करमत नाही. यापूर्वीच ते अजितदादा यांच्याबरोबर येणार होते. पण, काय झाले हे माहिती नाही. त्यांच्यात बंद दाराआड ३५ मिनिटे चर्चा होत असेल, काय कसे सुरू आहे, नुसते हे तर विचारले नसेल. त्यांचे निश्चित राजकीय बोलणे झाले असेल. काही चर्चा झाली असेल. पण, मला त्याबाबत कल्पना नाही. मात्र, भविष्यात जयंत पाटील पक्ष सोडतील हे निश्चित, असा दावा संजय शिरसाट यांनी केला.

दरम्यान, संजय राऊत यांनी या घडामोडींवर केलेल्या भाष्यासंदर्भात संजय शिरसाट यांना प्रतिक्रिया विचारण्यात आली. त्यावर ते म्हणाले की, ज्यांनी गद्दारी केली ते असे बोलतात का? शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराशी गद्दारी करून काँग्रेस, राष्ट्रवादीच्या मांडीवर बसणारे निष्ठेच्या गोष्टी शिकवतात. यामुळेच यांनी सगळा पक्ष संपवला. संजय राऊत जे बोलतात त्याच्या नेमके उलट घडते हा आतापर्यंतचा इतिहास आहे. म्हणून यापुढे ठाकरे गट आणि राष्ट्रवादीत स्फोट होईल, असेही शिरसाट यांनी म्हटले आहे.

## संपादकीय ......

# चाहूल जलसंकटाची!

*संपूर्ण जगातच हवामान बदलामुळे ऋतुचक्र मोठ्या प्रमाणात पालटले आहे. त्यामुळे पावसाळ्यात अवर्षण, हिवाळ्यात गरम हवा आणि उन्हाळ्यात अवकाळी पाऊस, याचीही आपल्याला सवय झाली आहे; पण यामुळे शेतीसंकट निर्माण झाले असून, दुसरीकडे दुष्काळ व अतिवृष्टीमुळे नुकसान प्रचंड वाढले आहे. महाराष्ट्रानेही गेल्या काही वर्षांत अशाच संकटांचा सामना केला आहे. खरे तर, गेल्या वर्षी भरपूर आणि सातत्यपूर्ण पाऊस पडल्यामुळे राज्यातील सर्वच भागांत जी धरणे आहेत, तेथे समाधानकारक प्रमाणात पाणीसाठा होता; पण यावेळी हिवाळा सुरू असतो त्याच काळात म्हणजे जानेवारीच्या १५-१६ तारखेपासूनच अचानकपणे उष्णता निर्माण झाली. त्यामुळे बाष्पीभवन होऊन धरणांमधील वेगवेगळ्या जलसाठ्यात असलेले पाण्याचे प्रमाण कमी होऊ लागले. फेब्रुवारीच्या उत्तरार्धात पुन्हा उष्णता वाढली व थंडीचे प्रमाण कमी झाले. त्यानंतर थंडी तर पळूनच गेली आणि आता तर सर्वत्र उन्हाची काहिली सुरू झाली आहे. पुण्या-मुंबईत उष्णतेचे प्रमाण अधूनमधून ३८ ते ४१ अंशांदरम्यान जाऊ लागले. विदर्भ आणि मराठवाड्यात तर दुपारी बाहेर पडणे अशक्य झाले आहे. मराठवाड्यातील मोठ्या, मध्यम आणि लघू प्रकल्पांमधील पाणीसाठाही अर्ध्यावर आला असून, काही जिल्ह्यांत आतापासूनच टँकरने पाणी पुरवण्याची वेळ आली आहे. धरणातील पाण्याचे लक्षणीय प्रमाणात बाष्पीभवन होत असून, त्यामुळे मुंबईला पाणीपुरवठा करणार्या सातही धरणांतील पाण्याची पातळी झपाट्याने खालावत आहे. पावसाळ्यास अद्याप तीन महिने बाकी आहेत आणि मुंबई परिसरातील या धरणांमधील पाणीसाठा ४२ टक्क्यांवर आला आहे.*

*यापैकी काही धरणांत आपत्कालीन परिस्थितीत उपयोगी पडावा म्हणून राखीव साठाही ठेवण्यात येतो; पण त्याचवेळी मुंबईसारख्या राजधानीच्या शहरातही बर्याचदा पाईपलाईन फुटून हजारो लिटर पाणी वाया जात असते. अशा स्थितीत राज्यातील धरणांतून आता केवळ ५१.६५ टक्के पाणीसाठा उरला असून, मागील वर्षाच्या तुलनेत तो ९.६ टक्के जास्त आहे; पण उन्हाचा तडाखा जसजसा वाढत जाईल, तसतसा हा साठा घटू लागण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे, कोकण असे सहा जलसंपदा विभाग आहेत. एकूण २,९९७ धरणे आहेत. २०२४च्या फेब्रुवारीत सर्वच धरणांमध्ये ६० टक्क्यांपेक्षा जास्त पाणीसाठा होता. यावेळी तो ५० टक्क्यांच्या आसपास आहे. राज्यात मोठ्या, मध्यम आणि लहान धरणांची एकूण साठवण क्षमता १४३०.६३ टीएमसी इतकी आहे. एकीकडे दरवर्षी भूजल पातळी एक मीटरने खालावत असलेल्या मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रातील नेपानगर, बुर्हानपूर, रावेर, यावल आणि चोपडा तालुक्यांमध्ये तापी महाकाय जलपुनर्भरण प्रकल्पाच्या दुसर्या टप्प्यामुळे भूजल पातळी वाढवण्यासह साडेतीन लाख हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. महाराष्ट्रातील अमरावती, अकोला, बुलढाणा, जळगाव यासह खानदेशातील धारणी, अचलपूर, दर्यापूर, अंजनगाव, सुरजी, तेल्हारा, अकोट, संग्रामपूर, जळगाव, जामोद, रावेर, यावल, चोपडा आणि मुक्ताईनगर तालुक्यांमध्ये या प्रकल्पाचा लाभ होणार आहे. तापी आणि शिंपणा नदीच्या संगमावर प्रस्तावित डायव्हर्शन वेअर बांधला जाणार आहे. उजव्या-डाव्या कालव्याद्वारे पुराच्या पाण्याचे जलपुनर्भरण केले जाणार आहे. या प्रकल्पामुळे राज्यातील २ लाख ३४ हजार हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा फायदा होणार आहे. जलस्रोत व्यवस्थापनाच्या दृष्टीने हा प्रकल्प राज्यासाठी क्रांतिकारी ठरणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यताही मिळाली आहे. नदीजोड प्रकल्पांचेही भविष्यकाळात फायदे होणार आहेत; पण आज जे मोजके पाणी उपलब्ध आहे, त्याचा तरी बेतानेच वापर करणे आवश्यक आहे; मात्र पाण्याचे मोल व उपलब्धता लक्षात न घेता लोक पाण्याचा बेसुमार वापर करत असतात.*

*बर्याच ठिकाणी पाण्याच्या तोट्या उघड्या ठेवलेल्या असतात. अनेक जण पंचतारांकित हॉटेलांत शॉवरचा व पोहोण्याचा आनंद लुटत असतात. शहरांमधील वॉटर पार्क्समधून पाण्याची हवी तशी उधळपट्टी होत असते. एकीकडे हजारो गोरगरिबांना, झोपडपट्टीवासीयांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते आणि दुसरीकडे चंगळवादी वर्ग मात्र पाणी वाया घालवताना दिसतो. पाण्याची सरासरी उपलब्धता कमी असल्यामुळे भारत हा जगातील पाण्याची टंचाई असणारा एक प्रमुख देश असेल, असा होरा जागतिक बँकेने व्यक्त केला आहे. तो वेळीच गांभीर्याने घेण्याची गरज यासाठी आहे की, एकदा का दुष्काळाने डोके वर काढले की, त्यातून सुटका नाही. सारे काही निसर्गावर सोडण्याशिवाय पर्याय नाही. ७० वर्षांपूर्वी भारतात दरडोई पाण्याची उपलब्धता सुमारे ५,१०० किलोलिटर होती, ती आता १४०० किलोलिटरवर आली आहे. धरणांमधील ३५-४० टक्के पाण्याचे बाष्पीभवनही होत असते, हे लक्षात ठेवले पाहिजे.*

*पाण्याचे समान वाटप आणि त्याची नासाडी होऊ नये, याची दक्षताही घेतली गेली पाहिजे. भूगर्भातील पाणीसाठ्याचा अमर्याद उपसा झाल्यामुळे हे साठे झपाट्याने आटू लागले आहेत. भारतात सुमारे ८०० जिल्हे असून, त्यापैकी २३४ जिल्ह्यांमध्ये पाण्याचा उपसा अमर्याद आहे. पाण्याचा अनिर्बंध वापर असाच सुरू राहिल्यास येत्या पाच वर्षांत गरजेच्या केवळ ५० टक्केच पाणी उपलब्ध राहील, असा इशारा नीती आयोगाने यापूर्वीच दिला आहे. संयुक्त राष्ट्राच्या विद्यमाने घेण्यात आलेल्या विश्वव्यापी पाणी परिषदेत 'राईट टू वॉटर' हा अधिकार सर्वच देशांत राबवण्याबाबत मतैक्य झाले होते. १५ व्या वित्त आयोगाच्या अहवालातही जलसाठे आणि जलसंवर्धनाबाबत विकेंद्रीकरणाला चालना देण्याची शिफारस करण्यात आली आहे. महाराष्ट्रात जलयुक्त शिवारसारखी योजना नेटाने राबवली जात आहे. स्वयंसेवी संस्थांचा व लोकांचा त्यामधील सहभाग वाढला पाहिजे; मात्र कितीही पाणी उपलब्ध झाले, तरी वाढत्या लोकसंख्येमुळे ते पुरेसे पडणारे नाही. म्हणून पाण्याचा किमान वापर करण्याबद्दल लोकांचे प्रबोधन होण्याची गरज आहे. अन्यथा घोटभर पाण्यासाठी गावोगावी संघर्ष वाढतच जाईल.*

# विद्यापीठात २४ मार्च रोजी जल व्यवस्थापनावर राज्यस्तरीय कार्यशाळा

## आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती-** पाणी हे जीवन आहे, त्याशिवाय मनुष्य, प्राणी आणि सजीवसृष्टीची कल्पनाही करता येत नाही. पाणी हे माणसाला जगवतं आणि अश्याच पाण्याचा अपव्यय जर वाढत असेल तर भविष्यात पाणी टंचाईचा सामना लवकरच करावा लागू शकतो हीच ज्वलंत समस्या लक्षात घेऊन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत एम. ए. आजीवन अध्ययन व विस्तार या अभ्यासक्रमाच्या वतीने आंतरराष्ट्रीय जल दिनाचे औचित्य लक्षात घेता सोमवार दिनांक २४ मार्च, २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता विद्यापीठ परिसरातील 'स्व.डॉ.श्रीकांत जिचकार मेमोरियल रिसर्च सेंटर येथे 'छत्रपती शिवाजी महाराजांचे जल व्यवस्थापन आणि सद्यस्थिती' या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.



कार्यशाळेच्या उद्घाटक म्हणून जि. प. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, प्रमुख अतिथी म्हणून आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ सदस्य डॉ. रवींद्र सरोदे, बीजभाषक म्हणून इतिहास संशोधक प्रा. अनिरुद्ध पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यशाळेतील विविध सत्राद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या काळात केलेले जल व्यवस्थापन आजच्या परिस्थितीला कसे उपयुक्त राहील यासंदर्भात वैचारिक मांडणी करण्यात येणार असून समाजामध्ये पाण्याचा होत असलेला अपव्यय यावर नियंत्रण यावे यासाठी विद्यार्थी तसेच समाजातील सर्वसामान्य घटकांनी आपल्या कुटुंबात, समाजात, शेतात तसेच इतर ठिकाणी पाण्याची कशी बचत करावी यादृष्टीने प्रात्यक्षिक कार्याचे धडे सुद्धा या कार्यशाळेच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. जलसिंचन व जलसंधारणाची उपयुक्तता लक्षात घेता त्याची समाजामध्ये प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी अश्या महत्वपूर्ण कार्यशाळेच्या माध्यमातून जलजागृती होण्यास मदत होईल. अश्या महत्वपूर्ण विषयाच्या अनुषंगाने ज्यांचं पाणी या क्षेत्रात विशेष कार्य आहे असे श्री. प्रवीण कदम, मा. सरपंच सिंदखेड आणि प्रा. डॉ. वैभव मस्के, इतिहास तज्ञ अमरावती उपस्थित राहणार आहेत. या समाजभिमुख कार्यशाळेला पर्यावरण प्रेमी, मृदा संवर्धन आणि संरक्षण यामध्ये काम करणारे कर्मचारी, इतिहास अभ्यासक, संशोधक, शिवप्रेमी, विद्यार्थी, शेतकरी व सर्व क्षेत्रातील अभ्यासक व जाणकार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विद्यापीठाचे मा. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले आहे.

# बोअरवेल खोदण्यासाठी मिळवा ५० हजार रुपयांचे अनुदान, वाचा सविस्तर

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक**

अनुसूचित जमातीतील शेतकऱ्यां साठी महाराष्ट्र शासनाकडून बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (इळीर राबविली जाते. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेच्या माध्यमातून सरकार शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर नवीन विहीर, विहिरीमध्ये बोअरिंग, शेततळ्यांसाठी प्लास्टिक पन्नी, सूक्ष्म सिंचन, पीव्हीसी पाइप आणि जुनी विहीर दुरुस्तीकरता येते. आता यात बोअरवेल(इॄीुशश्रश्र) समाविष्ट करण्यात आले आहे. त्यासाठी ५० हजारांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे.




शेतातील सिंचन क्षमता वाढविण्यासाठी शासनाच्या वतीने विविध योजनांच्या माध्यमातून लाभदिला जात आहे. याअंतर्गत शेतकरी शेतात पिकांसाठी पाण्याची सुविधा करत आहेत. गत पाच वर्षात शासनाच्या वतीने सिंचन विहिरींच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी सिंचनाची सोय उपलब्ध करून दिलेली आहे. विशेष म्हणजे, जिल्ह्यात अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांची संख्या बरीच आहे. या योजनेचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा.

काय आहेत निकष ?

अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

अर्ज करणारा शेतकरी हा असूचित जमातीमधील असावा.

पात्र अर्जदाराकडे स्वतःचा जातीचा दाखला असावा.



अर्जदाराचा उत्पन्नाचा दाखला असणे आवश्यक आहे.

अर्जदार शेतकऱ्याचे वार्षिक उत्पन्न दीड लाख रुपयांपेक्षा अधिक असू नये.

शेतकऱ्याचा जमिनीचा सातबारा आणि आठ अ हे त्याच्याच नावाने असावे.




पात्र अर्जदाराकडे किमान ०.४० हेक्टर जमीन असणे गरजेचे आहे.

आवश्यक कागदपत्रे

बोअरवेलच्या लाभासाठी अर्जदाराचे आधारकार्ड

जातीचा दाखला

उत्पन्नाचा दाखला

सात बारा व आठ-अ

दारिद्र्यरेषेचे कार्ड

अर्जदाराचे शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र

पाणी उपलब्धतेचा दाखला (विहिरीसाठी)

०.४० हेक्टर शेती असल्याचा तलाठ्याचा दाखला

शेतात विहीर नसल्याचा दाखला.

५०० फुटांच्या अंतरावर कुठचीही विहीर नसल्याचा दाखला (विहिरीसाठी),


कृषी अधिकाऱ्याचे क्षेत्रीय पाहणी शिफारसपत्र,

संबंधित क्षेत्रातील गटविकास अधिकाऱ्याचे शिफारसपत्र,

जागेचा फोटो,

ग्रामसभेचा ठराव

आदी कागदपत्रे आवश्यक आहेत. सदर कागदपत्रांची पूर्तता अर्ज मंजुरीनंतर करावी लागते.




**अर्ज कसा कराल?-** महाराष्ट्र शासनाच्या महाडीबीटी या अधिकृत संकेतस्थळावर शेतकरी योजना नावाचा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करायचे आहे. नंतर तुम्हाला बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना नावाचा पर्याय दिसेल त्याला ओपन करायचे आहे. अधिक माहितीसाठी कृषी सहाय्यक किंवा सीएस्सी केंद्रावर संपर्क करावा.




## दुपारी झोपणं योग्य की अयोग्य, आयुर्वेद याबाबत काय सांगतं? वाचाल तर रहाल फायद्यात..

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक**

घरी असणारे किंवा सुट्टी असणारे बरेच लोक दुपारी भरपूर झोप घेतात. खासकरून ज्या महिला गृहिणी आहेत. त्या दुपारी झोपणं पसंत करतात. झोपल्यावर आराम भलेही वाटत असला तरी आयुर्वेदात मात्र दुपारी झोपण्याला नुकसानकारक मानलं जातं. दुपारी झोपण्याचे शरीरावर अनेक नकारात्मक परिणाम होतात. अशात दुपारी झोपणं नुकसानकारक कसं ठरतं किंवा दुपारी कुण झोपावं आणि कुणी झोपू नये हे जाणून घेणं फार महत्वाचं ठरतं.




दिवसा झोपण्याचे नुकसान

आयुर्वेदानुसार, दिवसा झोपणं आरोग्यासाठी चांगलं नाही. अनेक रिसर्चमधूनही समोर आलं आहे की, दिवसा झोपल्यानं शरीरात कफ वाढतो. १० ते १५ मिनिटांची झोप घेणं चुकीचं नाही, पण दिवसा अनेक तासांची गाढ झोप घेणं आरोग्यासाठी चांगलं नाही.

दुपारी कुणी झोपू नये?

- जर तुम्हाला फिट रहायचं असेल, सोबतच मेंटल हेल्थही चांगली ठेवायची असेल तर दिवसा झोपू नका.

- जे लोक पोटावरील आणि कंबरेची चरबी कमी करण्याचा विचार करत आहेत त्यांनी केवळ रात्री झोपावं.

- जे लोक जास्त तेलकट, तळलेले किंवा मैद्याचे पदार्थ खातात त्यांनी दिवसा अजिबात झोपू नये.

- जे नेहमीच कफ वाढण्याच्या समस्येने वैतागलेले असतात, त्यांनीही दिवसा झोप घेऊ नये.

- डायबिटीस, हायपोथायरॉइड आणि पीसीओएस आजाराने पीडित लोकांनी दिवसा झोपू नये.

दिवसा कोण झोपू शकतात?

- प्रवासामुळे किंवा खूप जास्त मेहनतीचं काम केलं असेल असे लोक दिवसा थोडा वेळ झोप घेऊ शकतात.

- जे लोक फार सडपातळ किंवा कमजोर आहेत, त्यांनीही दिवसा झोपलं तर काही हरकत नाही.

- आजारी असाल किंवा सर्जरी झाली असेल तर डॉक्टर दिवसा आराम करण्यास सांगतात तेव्हाही दिवसा झोप घ्यावी.

- गर्भवती महिलांनाही आरामाची गरज असते, त्यांनीही दिवसा झोप घ्यावी.

- १० वर्षापेक्षा कमी आणि ७० वयापेक्षा जास्त असलेले लोकही दिवसा आराम करू शकतात.-

# जिनिंग फॅक्टरी मध्ये चोरी करणारी टोळी गजाआड

## गुन्हे शाखा युनिट एकची यशस्वी कामगिरी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२२अमरावती**-वलगांव पोलीस स्टेशन अंतर्गत बंद जिंनीग फॅक्टरी येथून इलेक्ट्रिक मोटर व लोखंडी सामग्री चोरी करणारी टोळी गुन्हे शाखा युनिट एकने जेरबंद केली आहे. टोळीकडून २.४० लाखाचा मुद्देमाल देखील जप्त करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीं मध्ये शुभम भाऊराव उताणे (२८वर्षे, धनगर पुरा वलगांव ), नूर शाह मोहम्मद शहा (४४, बिस्मिल्ला नगर, अमरावती) व शेख अकिल शेख लाल ( ५०, लालखडी, रिंगरोड अमरावतीचा) समावेश आहे. त्यांचा इतर एक साथी शरीफ खान उर्फ गुड्डू अजीज खान (सतीनगर, वलगांव )फरार आहे. त्याचा शोध घेण्यात येत आहे. माहितीनुसार गेल्या १७ मार्च रोजी शिराळा निवासी धनराज कृष्णराव जुमळे यांनी वलगांव ठाण्यात तक्रार दिली होती कि, शिराला येथील रेचा व जनिंग फॅक्टरी मधून टिनपत्रे कापून रेचा व जिनींग साहित्य असा १.८० लाखांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला. जिनिंग फॅक्टरी बरेच दिवसातून बंद आहे. बारकाईने विचारपूस केली असता चोरट्यांनी चोरीचा माल नेण्यासाठी फोर व्हीलर गाडीचा वापर केला असल्याचे समोर आले. गुप्त बातमीदार कोण माहिती मिळाली की, त्यादिवशी पहाटे पाच वेळा पिवळ्या रंगाचा लोडिंग ऑटो घटना स्थळावरून गेला होता.या मार्गावरील ५० ते ६०सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली, असता सदर ऑटो लालखडी अमरावतीचा असल्याचे माहित पडले. त्याच प्रमाणे रेकॉर्डवरील गुन्हेगार शुभम उताणे हा देखील काही दिवसापासून लालखेडी भागात येत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी सर्वप्रथम शुभमला ताब्यात घेतले.त्याने सांगितले की इतर साथीदारांसोबत मिळून त्याने ही चोरी केली आहे. पोलिसांनी ३ आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून रेच्या वरील ८ इलेक्ट्रिक मोटर ४०,००० व दोन बजाज मॅक्सीमा लोडिंग ऑटो एमएच २७ बीडब्ल्यू ५६१२ व एमएच २७ बीडब्ल्यू ६२९१ असा एकूण २ लाख ४० हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी,उपायुक्त कल्पना बारवकर ,सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त शिवाजीराव बचाटे ,अरुण पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट एकचे पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, सहायक निरीक्षक निरीक्षक मनीष वाकोडे, प्रकाश झोपाटे, सतीष देशमुख, फिरोज खान, सचिन बहाळे, अलीमुद्दीन खतीब, विकास गुडघे, सचिन भोयर, सुरज चव्हाण, निखिल गेडाम ,किशोर खेंगरे,अनिकेत कासार, निखिल माहुरे यांनी कारवाई मध्ये सहभाग घेतला.



# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २२ मार्च २०२५


शहर/ग्रामिण


# महापालिका आरोग्यावर १३०, शिक्षणावर ६९, सुरक्षेवर २५ कोटी खर्च करणार

## गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाचे बजेट ९६ कोटी रुपयाने कमी रकमेचे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती–** महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी शुक्रवार, २९ मार्चला सादर केलेल्या अर्थसंकल्पात महसुली उत्पन्न व खर्चात समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. महसुली उत्पन्न ४०२.२३ कोटी तर खर्च ४००.६६ कोटी रु. अर्थात १.५७ कोटी रु. शिलकीचे अंदाजपत्रक यंदा तयार करण्यात आले आहे. महसुली उत्पन्नाचा विचार करता गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाचे बजेट ९६ कोटी रुपयाने कमी रकमेचे आहे. तसेच महसुली व भांडवली असे एकूण ८८७ कोटींचे हे बजेट आहे. महसुली उत्पन्न ४०२.२३ तर भांडवली उत्पन्न ४४८.२० कोटींचे तसेच असाधारण ऋण व निलंबन असा एकूण हा ८८७.६९ कोटींचा अर्थसंकल्प आहे. या वेळी बहुतेक सर्वच खर्चाना कात्री लावली



असून किफायती बजेट सादर केले आहे. यंदा आरोग्य सोयी सुविधांवर १३०.७५ कोटी, शिक्षणावर ६९.७६ कोटी, सार्वजनिक सुरक्षेवर २५.४२ कोटी रु. प्रामुख्याने खर्च केले जाणार आहेत. आरोग्यावर गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा ३७.२ कोटी रु. कमी खर्च केला जाणार आहे. आयुक्तांनी महसुली खर्चात कपातीचे जे संकेत दिले होते, त्यानुसार यंदा अनेक खर्च कमी केले आहेत. त्यात आरोग्याचाही समावेश आहे. शहरात मनपाने २० पैकी १९ आरोग्यवर्धिनी केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, ९ केंद्र लवकरच सुरू केले जाणार आहेत. शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, ३० वर्षांवरील महिलांचे आरोग्य स्क्रीनिंग करणार, ४ लाख लोकांपर्यंत पोहोचणार असल्याचे मनपा आयुक्तांनी सांगितले. सुकळी येथे मृत जनावरांसाठी दाहिनी, १९ कोटींचे फिशरीज हबचे काम अंतिम टप्प्यातआहे. शिवटेकडीचे सौंदर्याकरण, पीएमई बस सेवा सुरू करणार, बडनेरा येथील अग्निशमन केंद्राचे काम पूर्ण करणार, तसेच शहरात नगरोत्थान अंतर्गत २०० कोटींची कामे यंदाच्या वर्षात केली जाणार आहेत. शिक्षणासाठी पायाभूत सुविधा वाढवणार : मनपा शाळांची एकूणच स्थिती बघता शिक्षणासाठी पायाभूत सुविधा वाढवल्या जाणार आहेत. जेवड शाळेला १ कोटी रु. देण्यात आले असून अलीम नगर शाळेलाही रक्कम देण्यात आली आहे. एकूण २.५ कोटी रु. पायाभूत सुविधेसाठी खर्च केला जात असून, डीपीसीतून ५० कोटी रु. मिळणार आहेत. सोबतच शाळांच्या डिजिटलायझेशनसाठी खनिज निधी, सीएसआर निधीतून खर्च केला जाणार आहे.

### वास्तववादी अर्थसंकल्प सादर केला



यंदा महापालिकेने आर्थिक वर्ष २०२५–२६ साठी नेमके महसुली उत्पन्न व आवश्यक खर्च याबाबत वास्तविकता विचारात घेत अर्थसंकल्प सादर केला आहे. उगाच मोठ्या योजना, जास्तीची तरतूद यात केली नाही. शक्य आहे, तेच बजेटमध्ये मांडले आहे. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत तो सुमारे ९६ कोटी रुपयांनी कमी आहे.

**– सचिन कलंत्रे, आयुक्त तथा प्रशासक, मनपा**

विदर्भ प्रजासत्ताक

# अमरावती जिल्हा वकील संघाच्या निवडणुक प्रक्रियेस वेग...

## बहुतांश वकील सदस्य यांच्या वतीने ॲड.हरीश निंबाळकर यांना अध्यक्ष पदी निवड करण्यास समर्थन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती**

अमरावती जिल्हा वकील संघाच्या निवडणुक दिनांक २१ मार्च २०२५ रोजी नामनिर्देशन पत्र उचल करून ते दाखल करून आज निवडणूक प्रक्रियेस प्रारंभ झाला आहे. तेव्हा अमरावती जिल्हा वकील संघाच्या निवडणुक रिंगणात विविध पदाच्या शर्यतीत अध्यक्ष पदाकरीता बहुचर्चित व सर्व मान्य चेहरा म्हणजेच ॲणहरीश निंबाळकर यांनी आपल्या संपूर्ण वकिली व्यवसाय कारकीर्दीत सर्वांच्या समस्या जाणून सहकार्याची भूमिका आत्ता पर्यंत सर्व जाती धर्माच्या वकील सदस्यांच्या करिता घेतलेली आहे.त्यामुळं आज नामांकन भरतेवेळी मोठ्या वकील संख्येत सदस्य यांच्या उपस्थितीत त्यांनी दुपारी २वाजता दरम्यान आपला अध्यक्ष पदाकरीता नामांकन अर्ज भरला आहे. त्यामुळे सदर निवणुक ही त्यांना त्यांच्या भूतकाळातील योग्य कामकाज आणि सहकार्याची भूमिका घेतल्याने आणि सर्व धर्म समभाव वृत्ती मुळे सर्वांना हवे हवेसे असणारे ॲडहरीश निंबाळकर हेच अमरावती जिल्हा वकील सदस्य बहुतांश वकील सदस्य यांच्या चर्चेत आत्ता पर्यंत बघायला मिळत आहे. ॲडहरीश निंबाळकर यांच्या अध्यक्षते पदाकरीता नामनिर्देशन अर्ज दाखल करतेवेळी स्वतः ॲडहरीश निंबाळकर,वरिष्ठ ड उज्ज्वल सोनोने ड महेंद्र भाऊ तायडे, ड अतुल चुटके, ॲड मनोज अंबाडकर ॲड प्रशांत देशमुख,ॲड शिरीष जाखड ॲड बबलू देशमुख , ॲड सुधीर तायडे, ॲड गजानन तांबटकर ॲड राजेंद्र गवळी,ॲड अमित बेले ,ॲड सुधीर तायडे ,ॲड दीपक सरदार ,ॲड विलास गावंडे ,ॲड उमेश इंगळे ,ॲड. मनिष सिरसाट,ॲडप्रीती खंडारे ,ॲड मनीष बिडकर,ॲडरवी गायकवाड ॲड प्रिया भगत,ॲड राजू म.कलाने, ॲड गौतम खोब्रागडे, सागर आठवले, ऋषाब आठवले, धनश्री अमृतकर, महेश डांब्रे व इतर वकिल सदस्या व मोठ्या संख्येने उत्साहात ज्युनिअर वकील सदस्य त्यावेळी उपस्थित होते.

# नांदगाव पेठ एमआयडीसीत सुरक्षारक्षकांना मारहाण करून दरोड्याचा प्रयत्न; दहा अटकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२नांदगाव पेठ–** नांदगाव पेठ एमआयडीसीमध्ये पीएम मित्रा ठेक्स्टाइल पार्कसाठी रस्ते तयार करण्याचे काम सुरू आहे. याच कामासाठी लागणारे सिमेंट त्या परिसरात ठेवले आहे. हेच सिमेंट चोरण्याचा चार जणांनी प्रयत्न केला, मात्र सुरक्षारक्षकांनी त्यापैकी एकाला पकडले तर तीन जण पळाले. त्यानंतर त्या तिघांनी त्यांच्या इतर सहकाऱ्यांना बोलावून सुरक्षारक्षकांना बेदम मारहाण केली. ही घटना गुरुवारी (दि. २०) मध्यरात्री घडली. या प्रकरणात पोलिसांनी रात्रभर शोधमोहीम राबवून शुक्रवारी (दि. २१) सकाळपर्यंत दहा जणांना अटके कली आहे.

मो. जमील ऊर्फ जम्मू शेख नासिर सौदागर (३२), विजय रामदास मनोहर (२४), मो. शहजाद शेख नासिर (२४), मो. सादीक शेख नासिर (२२), सरवर खान सैफुल्ला खान पठाण (१९), मो. तवकिन शेख करामत (२०), मो. शोहेल मो. साकीर (१९), तौसिक अहमद मो. नासिर (२२), फिरोज खान अयाश खान (३६), मोअन्सार मो. शब्बीर (३६, सर्व रा. पटवारी प्लॉट, माहुली जहागीर) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. या प्रकरणात पोलिसांनी नीलेश विनायक राऊत यांच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध दरोड्याचा प्रयत्न व मारहाण या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. एमआयडीसी परिसरात पीएम मित्राचे काम सुरू असल्यामुळे सुमारे पाचशे हेक्टर परिसरात रस्ते तयार करण्याचे काम सुरू आहे. याच कामासाठी लागणारे सिमेंटचे पोते परिसरात ठेवलेले आहेत. गुरुवारी रात्री सुरक्षारक्षक दीपक डोळस यांना काही चोरटे सिमेंट पोते चोरण्याचा प्रयत्नकरत असल्याचे लक्षात येताच त्यांनी परिसरातील इतर सुरक्षा रक्षकांना फोनवरून ही माहिती



दिली. त्यामुळे तीन ते चार सुरक्षा रक्षक त्या ठिकाणी पोहोचले. त्यावेळी सुरक्षा रक्षकांनी चोरट्यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता एक जण त्यांच्या हातात आला व इतर पळून गेले. ज्याला पकडले त्याचे नाव मो. जमील ऊर्फ जम्मू शेख नासिर सौदागर असे सांगितले. याचवेळी पळून गेलेल्या तिघांपैकी एकाने माहुलीत त्यांच्या इतर सहकाऱ्यांना फोन लावून बोलावून घेतले. ते एका तवेरामध्ये आले. त्यानंतर दहा ते अकरा जणांनी मिळून दीपक डोळस व नीलेश राऊतयांना डोके, हात, मानेवर काठीने जबर मारहाण करण्यात आली. तसेच मो. जमील ऊर्फ जम्मू शेख नासिर सौदागर याला सोडवून नेले. त्यानंतर सुरक्षारक्षकांनी दिलेल्या माहिती वरून नांदगाव पेठचे प्रभारी ठाणेदार नितीन गावंडे त्यांच्या पथकासह घटनास्थळी पोहोचले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनी माहुली पोलिसांनाही माहिती दिली. त्यानंतर पोलिस आयुक्तालया च्या विशेष पथकाचे प्रमुख पीआय आसाराम चोरमले व त्यांचे पथक, माहुली व नांदगाव पेठ पोलिसांनी संयुक्त कारवाई करून शुक्रवारी सकाळपर्यंत दहा आरोपींना अटक केली आहे.

### आणखी आरोपींचा शोध सुरू

या गुन्ह्यात सहभागी असलेल्या दहा जणांना आमच्या पथकासह नांदगाव पेठ, माहुली पोलिसांनी अटक केली आहे. आणखी दोन ते तीन आरोपींचा या गुन्ह्यात सहभाग असल्याचे समोर येत आहे. त्यामुळे या फरार असलेल्या आरोपींचा शोध घेत आहोत.

**– पीआय आसाराम चोरमले,**

विशेष पथक प्रमुख, पोलिस आयुक्तालय, अमरावती.

# घरकुल लाभार्थ्यांना तत्काळ अनुदान द्या बसपाची मनपा आयुक्तयांना मांगणी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२२अमरावती–** .रमाई आवास योजनेतील पात्र व मंजूर असलेल्या लाभार्थ्यांना पहिल्या टप्प्यातील अनुदान वितरित करण्यात यावे,अशी मांगणी बहुजन समाज पार्टीने आज शुक्रवार २१ मार्च रोजी मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांना भेटून केली आहे. चर्चा दरम्यान माजी नगरसेवक अजय गोंडाणे यांनी सांगितले की, नुकतीच रमाई आवास योजनेतील पात्र लाभार्थ्यांची यादी मंजूर झाली आहे.त्याच प्रमाणे २५ कोटी रुपये महापालिकेकडे जमा झाले असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.या २५ कोटी रुपयांमधून मंजूर लाभार्थ्यांना एकाच वेळी लाभ देणे शक्य नाही. त्यामुळे काही लाभार्थ्याला लाभ देऊन पात्र लाभार्थ्यांना थांबविणे हे सुद्धा शक्य नाही. प्राप्त निधीतून पहिला हप्ता मंजूर यादीतील संपूर्ण पात्र लाभार्थ्यांना वितरित करण्यात यावा. शासना कडून दुसरा टप्पा मनपाला प्राप्त झाल्यास त्यामधून पात्र लाभार्थ्यांना दुसरा व अंतिम टप्पा वितरित करण्यात यावा. अशी मांगणी या वेळेस करण्यात आली. चर्चा दरम्यान रामभाऊ पाटील ,रमेश नागदिवे, सचिन वैद्य ,प्रमोद सवाई, भीमराव शेंद्रे, श्यामराव कांबळे, सिंधु गणवीर, इंदिरा कांबळे, स्नेहा खोब्रागडे ,संगीता ढोके, सतीश मेश्राम, अशोक रंगारी, छाया शेंडे ,कोकिळा वानखेडे, माणिक नागदिवे, धीरज गणवीर, प्रवीण रंगारी, सचिन रंगारी, संजय डोंगरे, बेबी राऊत, माया घनमोडे, अन्नपूर्णा रामटेके, महेंद्र गडलिंग ,सिद्धार्थ मेश्राम ,सविता फुलझेले व लाभार्थी उपस्थित होते.

# १४ तहसीलदारांसह पाच 'एनटीं'ना शो कॉज

## जन्म, मृत्यू दाखले प्रकरणी कलेक्टरची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती–** भाजप नेते किरीट सोमय्या यांनी जिल्ह्यातील जन्म मृत्यू प्रमाणपत्र प्रकरणात घोळ असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर अंजनगाव, अमरावती या ठिकाणी गुन्हेसुद्धा दाखल झाले आहेत. दरम्यान याच प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील चौदाही तहसीलदारांसह पाच नायब तहसीलदारांना गुरुवारी (दि. २०) 'शो कॉज' नोटीस बजावल्या असून, तातडीने या प्रकरणात खुलासा मागवला आहे. या नोटीस बजावल्यामुळे महसूल विभागात खळबळ उडाली आहे.जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या नोटीसमध्ये तहसीलदारांना विचारण्यात आले, की तहसीलमध्ये सुनावणी झालेल्या जन्म मृत्यू दाखल्यांबाबत आपण अपुऱ्या दस्तावेजाच्या आधारे काही दाखले दिले आहे, ते कसे काय दिले. तसेच इतरही बाबींबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्टीकरण मागवले आहेत. या नोटीस जिल्ह्यातील चौदाही तहसीलदारांना बजावण्यात आल्या आहेत. याचवेळी अचलपूर, नांदगाव खंडेश्वर, अमरावती, चांदूर बाजार आणि चिखलदरा तहसीलमधून जवळपास चार हजारांवर जन्म, मृत्यू दाखल्यांची सुनावणी नायब तहसीलदार यांनी केली व ते दाखले वितरीत करण्यात आले आहे. वास्तविकता तहसीलदार यांच्यापेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांना दाखल्यांवर सुनावणी घेण्याचे तथा आदेश देण्याचे अधिकार नाहीत, असे असतानाही आपण दाखले कसे आदेशित केले, अशी विचारणा करून यांच पाच तहसीलमधील संबंधित नायब तहसीलदारांना शो कॉजनोटीस देण्यात आली आहे.

कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागितलाजन्म–मृत्य दाखला प्रकरणी जिल्ह्यातील १४ तहसीलदार व नायब तहसीलदारांना कारणे दाखवा नोटीस जारी करून त्यांना खुलासा मागितला आहे.

**सौरभ कटियार, जिल्हाधिकारी.**



# आग्रा शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य स्मारक

## देवेंद्र फडणवीसांच्या आश्वासनाची पूर्तता करणारा शासन निर्णय जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२मुंबई–** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीला ३९५ वर्ष पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने आग्रा येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आश्वासन दिले होते की, आग्रा शहरात ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांना नजरकैदेत ठेवले होते, ती वास्तू महाराष्ट्र शासनामार्फत अधिग्रहीत करून तेथे भव्य स्मारक उभारण्यात येईल. त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात येईल. या आश्वासनाची पूर्तता करणारा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आग्रा येथील छत्रपती शिवाजी महाराजांना ज्या ठिकाणी बांधले होते त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यात येईल, असे सांगितले होते. त्यासाठी आज सरकारने औपचारिकरित्या जीआर जारी करून आग्रा येथील ती जागा महाराष्ट्र सरकार अधिग्रहित करणार असून तेथे छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारणार असल्याची औपचारिक घोषणा केली आहे. वास्तविक महाराजांना मुघलांनी कैद केले होते. पण त्यांच्या बुद्धीमत्तेमुळे ते महाराष्ट्रात परत आले होते.



**राज्य सरकारचा शासन निर्णय असा–** महाराष्ट्र शासन स्वनिधीतून आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराज ज्या ठिकाणी नजरकैदेत होते, ती जागा/वास्तू अधिग्रहित करेल.

शासनाकडून या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक निर्माण करण्यात येईल, या शौर्य स्मारकामध्ये महाराजांचा जाज्वल्य इतिहासाचा योग्य तो परिणाम साधण्यासाठी विभागामार्फत आवश्यक ते उपक्रम (संग्रहालय, दृकश्राव्य कार्यक्रम, माहितीपट इ.इ......) राबविण्यात येईल.

या प्रकल्पाकरीता जमीन अधिग्रहण आणि इतर तनुषंगिक बाबीकरीता पर्यटन विभाग नोडल विभाग म्हणून कार्यवाही करेल त्याअतंर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ हे कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून कार्यरत राहतील.

पर्यटन विभाग या प्रकल्पाकरीता आवश्यक त्या निधीची तरतूद करेल.

आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक निर्माण करण्याकरीता व इतर बाबीकरिता मा. मंत्री (पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखाली इतिहास तज्ञांची / जाणकारांची वेगळयाने समिती निर्माण करण्यात येईल.

### या निर्णयाचे महत्त्व

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक पराक्रमाचे जतन व प्रचार–प्रसार

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशाचे जतन आणि पर्यटन क्षेत्राचा विकास

आग्रा येथील ऐतिहासिक स्थळी महाराष्ट्राचा ऐतिहासिक ठसा–

# समृद्धीवर प्रथमच ! दागिने लुटून दरोडेखोर महाराष्ट्राबाहेर

## नागपूरच्या महिला प्रवास्यास लुटले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२वर्धा–** विकासाचा महामार्ग म्हणून पुरुस्कृत झालेला नागपूर मुंबई समृद्धी महामार्ग सतत वेगळ्या कारणांनी आजवर चर्चेत राहला आहे. सातत्याने होणारे अपघात, अनियंत्रित वेगाने वाहणारी वाहने, चालत्या वाहनावर दगडफेक, टोल कर्मचाऱ्यांचा संप, कॅन्टीनवर गैरसोय अशी समृद्धी मार्गाची चर्चा विविध कारणांनी होत आहे. आता तर थेट लूटमार झाली आहे. सर्व प्रवासी या घटनेने भयभीत झालेले आहेत.

पुण्यावरून नागपूरला जाणाऱ्या बसमधील प्रवासी या घटनेचे साक्षीदार आहेत. विजयानंद ट्रॅव्हल बस क्रमांक एम. एच.व्ही टी. ६३६२ ही इच्छित स्थळी समृद्धीवरून निघाली. वाटेत मार्गावरील विरूळ येथे पेट्रोल पंपावर थांबली. या मार्गावरील बसेस इथेच नेहमी थांबतात. या बसमधील प्रवासी हा नियमित थांबा असल्याने या ठिकाणी चहापाणी करण्यास उतरले. त्यात नागपूरला निघालेल्या जयश्री वडसकर या सुद्धा पतिसह बस मधून उतरल्या. सोबत बॅग होती.तेव्हा त्यांचा १५ वर्षीय मुलगा बसमध्येच बसून होता. त्यावेळी एक अज्ञात व्यक्ती बसमधील या कुटुंबाची बॅग हुडकत असल्याचे मुलास दिसून आले. तेव्हा मुलाने आरडा ओरड केली. हा आवाज इतर प्रवास्यांनी ऐकला. मात्र काही लक्षात येण्यापूर्वीच सदर व्यक्तीने बसमधून पळ काढला. त्यावेळी बाजूलाच क्रेटा कार उभी होती. त्यात बसून हा व्यक्ती लगेच पसार झाला.




ही घटना घडताच मोठा कल्लोळ उडाला.घटनेची माहिती पुलगाव पोलिसांना कळली. पोलीस चमुने सीसीटीव्ही फुटेज तपासून ते ताब्यात घेतले. फिर्यादी जयश्री वडसकर यांची तक्रार नोंदवून घेतली आहे. बॅगमधून ११ तोळे ४० ग्राम सोने तसेच अन्य दागिने चोरट्यानी लंपास केले आहे. त्याची एकूण किंमत ३ लाख ४२ हजार रुपये असल्याचे सांगण्यात येते. पुलगाव पोलीस या प्रकरणी पुढील तपास करीत आहे.

ही घटना पोलिसांसाठी एक आव्हान ठरले आहे. कारण कार घेऊन येत प्रवासी हेरून ही लूटमार झाली आहे. नव्या दंड संहितेनुसार दरोडेखोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. लूटमार करण्यासाठी वापर झालेली गाडी ही महाराष्ट्र पासिंगची आहे. तांत्रिक प्राथमिक माहितीनुसार गाडी महाराष्ट्राबाहेर गेल्याचे निष्पन्न झाले आहे. लवकरच या दरोडेखोरांचा तपास लागण्याची खात्री पोलीस देत आहे. सदर महिला प्रवासी दागिने बाळगून असल्याची बाब बाहेर कशी माहित पडली, हा मुद्दा आहेच.

# सुरक्षा भिंती नसल्याने नाला खचला ४५ वर्षापासूनचा नागरिकांचा येण्या- जाण्याचा पन्नालालनगर रस्ता झाला बंद

## मनपा आयुक्तांना निवेदन तातडीने दुरुस्ती करा अन्यथा जनहितार्थ २१ एप्रिल पासून मिलिंद बांबल करणार मनपात आमरण उपोषण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती–** स्थानिक पन्नालालनगर मोठ्या नाल्याला सुरक्षा भिंती नसल्याने खचला असून नागरिकांचा ४५ वर्षापासून असलेला येण्या – जाण्याचा रस्ता बंद झाला आहे शेकडो नागरीक महिला , जेष्ठ नागरीक , युवक यांना येण्या – जाण्यासाठी हाच मुख्य रस्ता आहे .हा रस्ता नाल्याच्या बाजूने पूर्ण खचला असून मोठे खड्डे त्याला पडले आहे त्यामुळे रस्ता केव्हाही खाली येवून पडू शकतो आणी एखादी मोठी दुर्घटना होउन जीवितहानी होण्याची शक्यता आहे . नाल्याच्या दोन्ही बाजूंनी सुरक्षा भिंत नसल्याने दरवर्षी पावसाळ्यात नाल्याकाठील नागरिकांना अक्षरश्या जीव मुठीत घेऊन राहावे लागते . काही महिन्यापूर्वी माजी स्थायी समिती सभापती मिलिंद बांबल यांनी नाल्यात उतरून आक्रमक आंदोलन केले होते आणि



सातत्याने आक्रमक पाठपुरावा केल्यामुळे मनपाने पन्नालालनगर येथील चंदू सोजतीया यांच्या घरापासून ते पप्पू गहलोद यांच्या घरापर्यंत सुरक्षा भिंत बांधली पन पप्पू गहलोत ते रवी शेंडे यांच्या घरापर्यंत खचलेला नाला दुरुस्त केला नाही त्यामुळे अनियंत्रित झालेला साहित्याने भरलेला लोडेड ट्रक नाल्यात कोसळला आणी पन्नालालनगर रस्ता पुन्हा बंद झाला .मिलिंद बांबल स्थायी समिती सभापती असतांना ( सन :- २०१६-१७) शहरातील सर्व नाल्यांना दोन्ही बाजूंनीसुरक्षा भिंती बांधण्यात याव्या यासाठी



आमसभेत आणी स्थायी समितीमध्ये ठराव पारित करून शहरातील १६ मोठेनाले आणी १८ उपनाले यांना दोन्ही बाजूंनी सुरक्षा भिंती बांधण्यासाठी पुण्याच्या युनिटी कंसल्टंट कंपनीने ३७५ करोड ८० लक्ष रुपयाचा उझठ ( डि.पी.आर ) तयार केला होता पन त्यानंतर त्यावर काही कार्यवाही मनपाने केली नाही . सुरक्षा भिंती नसल्याने नाला दोन्ही बाजूंनी खचत चालला त्यामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे काही दिवसा अगोदर नाला खचल्यामुळे पन्नालालबगीच्या येथील पवन बागडी , रामेश्वर रौरासे ,प्रेमलता राठी तर गरीबनगर येथील पंचफुलाबाई इंगोले यांच्या घरमागील भिंती ( वॉल कंपाउंड )नाल्या खचल्यामुळे पडल्या आहे त्यांना सुध्दा काहीच मदत मिळाली नाही त्यांना सर्वांना मदत करण्यात यावी त्याचप्रमाणे नुकत्याच पन्नालालनगर येथील पप्पू गहलोद यांच्या घरापासून ते रवी शेंडे यांच्या घरापर्यन्त नाला खचल्यामुळे नागरिकांचा पन्नालालनगर रस्ता बंद झाला आहे .तरी तातडीने पन्नालालनगर येथील पप्पू गहलोद ते रवी शेंडे यांच्या घरापर्यंत नाल्याला सुरक्षा भिंत बांधून नागरिकांचा येण्या-जाण्याचा पन्नालालनगर रस्ता सुरू करण्यात यावा अन्यथा नागरिकांच्या सुरक्षेसाठी मनपा आवारात आमरण उपोषण करण्याशिवाय पर्याय राहणार नाही असा इशारा माजी स्थायी समिती सभापती आणी संघर्ष युवक संघटनेचे संस्थापक मिलिंद बांबल यांनी मनपा आयुक्त सचिनजी कलंत्रे यांना दिलेल्या निवेदनात केली आहे यावेळी मिलिंद बांबल ,अनिल काळे , गणेश मारोटकर , रामेश्वर रौरासे , निरज खेरडे , रवी शेंडे , सुरज मारोडकर , गजानन तेलंगे , दीपक अनासाने , राजेश गोफणे ,अविनाश मालोदे , सचिन आलाटकर , पंजाब बुढाळकर , मनोज जावरकर , पारिक , गहलोत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# मुस्लिमांना डोळे दाखवणाऱ्यांना सोडणार नाही

## राष्ट्रवादीच्या इफ्तार पार्टीत अजित पवारांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२मुंबई –** औरंगजेबाच्या कबरीच्या मुद्द्यावरुन गेल्या काही दिवसांपासून राज्यात तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे. अशातच मुस्लीम बांधवाचा पवित्र रमजानचा महिना असल्याने प्रशासनाकडून खबरदारी घेण्यात येत आहे. दुसरीकडे विविध राजकीय पक्षांकडून इफ्तार पार्ट्यांचे आयोजन देखील करण्यात येत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडूनही इफ्तारचे आयोजन करण्यात येतं. शुक्रवारी राष्ट्रवादीच्या इफ्तार पार्टीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हजेरी लावली होती. यावेळी बोलताना त्यांनी मुस्लिमांना डोळे दाखवणाऱ्यांना सोडणार नाही, असं म्हटलं. त्यांच्या या विधानाची आता जोरदार चर्चा सुरु आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यात धार्मिक तेढ वाढवणाऱ्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. अशातच नागपुरात औरंगजेबाच्या कबरीच्या मुद्द्यावरुन मोठा हिंसाचार झाला. त्यामुळे सर्वच स्तरातून शांतता राखण्याचे आयोजन करण्यात येत आहे. शुक्रवारी नरिमन पॉईंट येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे इफ्तार



पार्टीचे आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी अजित पवार यांनी रमजान हा समता, त्याग, समर्पण आणि बंधुत्वाची भावना निर्माण करणारा पवित्र महिना असल्याचे म्हटलं. तसेच दोन गटामध्ये भांडण लावणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत सोडलं जाणार नाही असा इशाराही अजित पवार यांनी यावेळी दिला.


समता, त्याग, समर्पण आणि बंधुत्वाची भावना निर्माण करणारा हा पवित्र महिना आहे. रमजान केवळ एका धर्मापुरता मर्यादित नाही. रमजान आपल्याला त्याग, एकता आणि बंधुत्वाची संदेश देतो. भारत विविधतेमध्ये एकतेच प्रतीक आहे. छत्रपती शिवाजी महाराज, बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि शाहू महाराज यांनी जातींना एकत्र घेऊन समाजाच्या उन्नतीचा मार्ग दाखवला. आपल्याला हाच वारसा पुढे न्यायचा आहे, असं अजित पवार म्हणाले.

आपण नुकतीच होळी साजरी केली आहे. आता गुढीपाडवा आणि ईद येणार आहे. हे सर्व सण आपण एकत्र साजरे केले पाहिजेत. कारण एकता हीच आपली खरी ताकद आहे. तुमचा भाऊ अजित पवार तुमच्या पाठीशी आहेत, याची मी खात्री देतो, असंही अजित पवार म्हणाले.

# बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचारावर RSS ‘ग्लोबल’ पातळीवर ‘विमर्श’ घडविणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२नागपूर : –** बांगलादेशमधीलहिंदू व इतर अल्पसंख्याकांवरील अत्याचाराबाबत केंद्र सरकारने कठोर भूमिका घेतली होती. मात्र,



तरीदेखील अजूनही तेथील हिंदूंना टार्गेट केले जात असून, त्यांच्यात दहशत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडूनबांगलादेशमधील अत्याचाराविरोधात मोठी मोहीम राबविण्यात येणार आहे. विशेषत: आंतरराष्ट्रीय समुदायामध्ये या विषयाची चर्चा व्हावी आणि हिंदू-अल्पसंख्याकांच्या अधिकारांच्या रक्षणासाठी ‘ग्लोबल’ आवाज उचलला जावा, यासाठी संघाकडून विशेष प्रयत्न करण्यात येणार आहे.

शुक्रवारपासून बंगळुरू येथे संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेला सुरुवात झाली. या सभेत दोन प्रस्तावांवर सखोल मंथन होणार आहे. संघ स्थापनेच्या शतकवर्षानिमित्त या सभेला महत्त्व आले असून, या वर्षातील कार्यक्रमांच्या नियोजनावर, तर चर्चेला सुरुवात झालीच आहे. सोबतच बांगलादेशमधील परिस्थितीबाबत प्रस्ताव मांडले जाणार आहे. संघाकडून बांगलादेशमधील हिंसाचाराविरोधात अगोदरदेखील ठोस भूमिका मांडण्यात आली होती. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी सार्वजनिक मंचावरून याची निंदा केली होती. संघ स्वयंसेवकांनी शक्य त्या पद्धतीने तेथील हिंदू व अल्पसंख्याकांना मदत पोहोचविण्याचा प्रयत्न केला होता.

या संपूर्ण पार्श्वभूमीवर संघाकडून हा मुद्दा आता आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याची तयारी सुरू झाली आहे. याचे नियोजन अखिल भारतीय प्रतिनीधी सभेत करण्यात येणार आहे. जागतिक समुदायाने बांगलादेशातील हिंदू आणि इतर अल्पसंख्याक समुदायांच्या मानवी हक्कांचे रक्षण करण्यासाठी पुढे यावे, अशी संघाची भूमिका आहे व त्यादृष्टीनेच आता पुढील पावले उचलण्यात येतील.

### बांगलादेशमधील घटना ही मानवतेवर काळिमा

संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी बांगलादेशमध्ये सातत्याने सुरू असलेल्या हिंसाचाराची निंदा केली आहे. तेथील घटना सुसंस्कृत समाजातील मानवतेच्या आणि लोकशाहीच्या कोणत्याही मानकांनुसार लज्जास्पद आहेत. तेथील स्थिती अद्यापही गंभीर असून तेथील हिंदू व अल्पसंख्याकांनी या स्थितीतदेखील दाखविलेली हिंमत नक्कीच कौतुकास्पद आहे, अशी भूमिका संघाने मांडली आहे. बांगलादेशमधील हिंदूंच्या सुरक्षिततेसाठी केंद्र सरकारने हरतऱ्हेने प्रयत्न करावे, असे आवाहन संघाकडून परत एकदा करण्यात आले आहे.

### मणिपूरमध्ये मैतेई-कुकींमध्ये ‘संवादसेतू’ साधणार

बांगलादेशसोबतच मणिपूरमधील हिंसाचाराबाबतदेखील संघाने चिंता व्यक्त केली आहे. तेथील विविध आदिवासी व जनजातीय समूहांना एकत्रित आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. विशेषत: मैतेई व कुकी समुदायाला एका मंचावर आणून त्यांच्यात संवादसेतू प्रस्थापित करण्यावर संघाकडून भर देण्यात येत आहे. दोन्ही समुदायांचे नेत्यांशी संघाचे अखिल भारतीय पातळीवरील अधिकारी संपर्कात आहेत. तसेच इंफाळ, गुवाहाटी व दिल्ली येथे बैठकादेखील झाल्या आहेत.

# नक्षलवाद्यांवर सुरक्षा यंत्रणांचा वार; ३८ जिल्ह्यांतच उरले अस्तित्व, सध्या छत्तीसगडच बालेकिल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२नागपूर :** छत्तीसगडमधील बस्तर भागातील बिजापूर व कांकेर जिल्ह्यात गुरुवारी सुरक्षादलांच्या ऑपरेशनमध्ये ३० नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला. पुढील वर्षीपर्यंत देश नक्षलमुक्त होईल, असा दावा गृहमंत्री अमित शाह यांनी केला आहे. सुरक्षायंत्रणांकडून त्या दृष्टीनेच सातत्याने नक्षल्यांवर वार करण्यात येत आहेत. मागील दहा वर्षांत सुरक्षादलांनी विविध माध्यमांतून नक्षलवादी संघटनांची कोंडी केली आहे. त्यामुळेच त्यांचा प्रभाव असलेल्या क्षेत्रात घट होत आहे. १० वर्षांतच



नक्षलवाद्यांचे अस्तित्व १२६ वरून केवळ ३८ जिल्ह्यांपुरते मर्यादित राहिले आहे. या संघटनांवरदेखील जोरदार प्रहार करण्याची तयारी सुरू असल्याची माहिती उच्चपदस्थ सूत्रांनी ‘लोकमत’ला दिली आहे. नक्षलवाद्यांचा बीमोड करण्यासाठी २०१५ साली राष्ट्रीय धोरण व कृती आराखडा निर्धारित करण्यात आला होता. सातत्याने नक्षलवाद्यांकडून हिंसाचार सुरू होता. सुरक्षायंत्रणांनी सर्वांत अगोदर नक्षलवाद्यांच्या फंडिंगच्या मार्गांवर प्रहार सुरू केला. २०१४ साली देशातील १२६ जिल्ह्यांमध्ये नक्षलवाद्यांचा मोठा प्रभाव होता. २०१८ मध्ये ही संख्या ९० वर आली तर २०२१ मध्ये ७० जिल्ह्यांत नक्षल्यांची सक्रियता होती. २०२४ मध्ये हाच आकडा ३८ वर आणण्यात सुरक्षायंत्रणांना यश आले.

# वक्फ बोर्डाने बळकावलेल्या खासगी तसेच देवस्थानच्या जमिनी काढून घेणार

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची विधानसभेत माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२मुंबई–** राज्यात अनेक ठिकाणी वक्फ बोर्डाने जमिनी बळकावण्याच्या तक्रारी केल्या जात आहेत. याबाबत केंद्रीय स्तरावर कायदा करण्याचे काम सुरु आहे. मात्र, खासगी आणि देवस्थानच्या जमिनी वक्फ बोर्डाने बळकावल्या असल्याचे आढळून आले तर त्या काढून घेतल्या जातील, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली.देवस्थान जमिनी वर्ग १ करणे, शासकीय जमिनींवरील अतिक्रमण आणि वन हक्क जमिनी याबाबत आमदार गोपीचंद पडळकर, आमदार




मोनिका राजळे आणि आमदार देवराव भोंगळे यांनी विधानसभेत दाखल केलेल्या लक्षवेधीला ते उत्तर देत होते.

महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले की, राज्य सरकारने या मुद्द्यावर गांभीर्याने विचार केला असून, महसूल विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या शिफारशींनंतर सरकार विधिमंडळात कायदा आणणार असल्याची माहिती त्यांनी दिली. मराठवाड्यात काही प्रमाणात शेतकऱ्यांना जमीन परत मिळण्याच्या निर्णयावर मंत्रिमंडळाने चर्चा केली असली, तरी प्रत्यक्ष कायदा मंजूर करावा लागेल असेही बावनकुळे म्हणाले.

अतिक्रमण रोखण्यासाठी लवकरच कडक कायदा

शेतकऱ्यांच्या जमिनींबरोबरच देवस्थानच्या इनाम जमिनींवरील अतिक्रमणांचाही मुद्दा अधिवेशनात चर्चेत आला. आमदार मोनिका राजळे यांनी महाराष्ट्रातील विविध भागांतील देवस्थानांच्या जागांवर होत असलेल्या अतिक्रमणावर आवाज उठवला. त्यांनी नागपूर, राहुरी, श्रीरामपूर, कोल्हार यांसह अनेक ठिकाणी मंदिरांच्या जागांवर अनधिकृतरीत्या बांधकामे झाल्याचे दाखवून दिले. यावर महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले, अतिक्रमण हटवण्या साठी स्थानिक प्रशासन आणि पोलीस यंत्रणेला निर्देश देऊन अतिक्रमण रोखण्यासाठी लवकरच कडक कायदा आणला जाणार असल्याचे स्पष्ट केले.

### वन हक्क अन् पट्ट्यांचा प्रश्न निकाली काढणार

जिवती तालुक्यातील वनहक्क आणि पट्ट्यांच्या मुद्यांवरही विधानसभेत चर्चा करण्यात आली. आमदार देवराव भोंगळे यांनी लक्षवेधी मांडली. त्यामध्ये जिवती तालुक्यातील ३३,४८० हेक्टर जमिनी वादग्रस्त ठरल्यामुळे अनेक शेतकरी जमिनीच्या मालकी हक्कांपासून वंचित आहेत. सरकारने यावर तातडीने उपाययोजना करावी अशी मागणी करण्यात आली. त्यावर महसूलमंत्री म्हणाले, याबाबत वन विभाग, केंद्र सरकार, महसूल, स्थानिक जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी यांची बैठक घेऊन जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल.

# माजी आमदार स्मृतीशेष स्व.भाऊसाहेब साबळे यांच्या स्मृतिदिनानिमित्त भव्य महाआरोग्य शिबिर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नया अकोला**

लोकनेते व माजी आमदार स्मृतीशेष स्व. भाऊसाहेब साबळे यांच्या स्मृतिदिनानिमित्त भव्य महाआरोग्य शिबिर नया अकोला येथे संपन्न झाले.शिबिराचे उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य व भारत कृषक समाज अमरावतीचे नवनियुक्त जिल्हाअध्यक्ष भैय्यासाहेब मेटकर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे संत गाडगेबाबा अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे, निमा आयुर्वेद फोरम असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. उन्मेष डालके, डॉ.अमोल ठवळी, प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. केवीन,डॉ.आकाश चांगोले, डॉ. विजय खंडारे, डॉ.अंकुश मानकर, डॉ.आनंद उल्हे, डॉ. सचिन खेडकर, श्री प्रवीणराव भोरे, श्री अर्जुन सनके, श्री विश्वंभर मार्के, अमित कुचे, जनसंपर्क अधिकारी श्री चरडे साहेब आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती.स्मृतीशेष स्व.भाऊसाहेब साबळे यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

सदर शिबिराचे आयोजन माजी जिल्हा परिषद सदस्य श्री प्रकाश दादा साबळे यांनी केले होते.उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत श्री दिवाकरराव सगने, सचिन साबळे,अक्षय साबळे, नंदूभाऊ वैराळे, गजानन इसळ, योगेश बोबडे यांनी केले.आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने डॉ. अमोल ठवळी, श्री नंदूभाऊ व्यवहारे, श्री विश्वंभर मार्के व श्री अर्जुन सनके यांचा शाल ,श्रीफळ,गणेश प्रतिमा देऊन उत्कृष्ट रुग्णसेवेबद्दल मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.अमरावती जिल्ह्याच्या भारत कृषक समाजाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री प्रकाश साबळे यांनी श्री भैय्यासाहेब मेटकर यांचा भावनिक सत्कार केला.संपन्न झालेल्या महाआरोग्य शिबिरात विविध आजारावरील शस्त्रक्रियेसाठी ४४ अत्यंत गरजू व गरीब रुग्ण आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे वर्धा येथे शस्त्रक्रियेसाठी रवाना करण्यात आले.

# १०० दिवस कृती विकास आराखड्यांतर्गत मेळघाटातील दूर्गम गावांना भेट व पाहणी

## नागरिकांचे जीवनमान सुकर होण्यासाठी प्रत्येक विभागांनी समन्वयाने कामे करा - विभागीय आयुक्त श्वेता सिंघल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

राज्य शासनाने १०० दिवसांसाठी सात कलमी कृती आराखडा निश्चित केला असून त्यात जनतेच्या तक्रारींचे निवारण, सुकर जीवनमान तसेच क्षेत्रीय कार्यालयांना भेटी हे घटक अंतर्भूत आहेत. मेळघाटसारख्या दूर्गम, आदिवासी बहुल भागातील नागरिकांचे जीवनमान सुकर होण्यासाठी प्रत्येक विभागांनी समन्वयाने कामे करून त्यांच्या अडचणी व समस्या सोडवाव्यात, असे निर्देश विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी आज दिले. सेमाडोह पर्यटन संकुल येथे १०० दिवस कृती आराखड्यांतर्गत मेळघाट क्षेत्रातील गावांना भेट व ग्रामस्थांच्या प्रश्नांचे निराकरण या कार्यक्रमांतर्गत श्रीमती सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या.



जिल्हाधिकारी सौरभ कटियार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, अपर आयुक्त अजय लहाने, रामदास सिध्दभट्टी, सुरज वाघमारे, उपवनसंरक्षक सुमीत सोळंके, दिव्यभारती एम., प्रकल्प अधिकारी प्रियवंदा म्हाळदळकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

या कार्यक्रमांतर्गत महसूल विभागाच्या दहा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मेळघाट परिसरातील दहा गावांना भेट देऊन तेथील ग्राम पंचायत, अंगणवाडी, प्राथमिक शाळा, आरोग्य केंद्र, रेशन दुकान, सोयी सुविधांची आदींची पाहणी करून ग्रामस्थांचे प्रश्न व समस्या जाणून घेतल्या.

श्रीमती सिंघल म्हणाल्या की, १०० दिवस कृती आराखड्यांतर्गत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मेळघाटातील गावांना प्रत्यक्ष भेटी व तेथील ग्रामस्थांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रशासनस्तरावर करावयाच्या उपाययोजनाबाबत आढावा घेण्यात आला. मेळघाटातील नागरिकांचे जीवनमान हे प्रामुख्याने जंगल व जंगलातील उत्पादनांवर आधारित आहे. येथील क्षेत्राचा विकास होण्यासाठी याठिकाणी पाणी पुरवठा, शिक्षण, आरोग्य, वीज, रस्ते, रोजगार आदी मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. टंचाईग्रस्त गावांना नियमितपणे पाणी पुरवठा होण्यासाठी विहिर खोलीकरण, गाव तलावातील गाळ काढून तेथे पाणी संचयनासाठी प्रभावी उपाययोजना होणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने संबंधित विभागांनी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. गावांत वीज पुरवठा अखंडीतपणे सुरु राहण्यासाठी विद्युत विभागाने सब स्टेशनची निर्मितीसाठी नियोजन करावे तसेच सोलर योजना प्रभावीपणे राबवावी.

महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांकडून भेटी दिलेल्या गावांतील प्रश्नांबाबत आढावा घेवून त्यापुढे म्हणाल्या की, पिढ्यांपिढ्यापासून वन जमीनीवर शेती करणाऱ्या आदिवासी बांधवांना वन हक्क पट्ट्यांचा ताबा देण्यासाठी वन विभागाने जाणीवपूर्वक प्रयत्न करावे. यासाठी विशेष मोहीम राबवावी. वन विभागाच्या अखत्यारित असलेली कामे स्थानिक गावकऱ्यांना प्राधान्याने देण्यात यावी. त्यांचे मजूरीचे मस्टर अद्ययावत ठेवून वेळेत मजूरीचे चुकारे करण्यात यावे. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत पावलेल्यांच्या वारसांना तत्काळ सानुग्रह मदत तसेच जखमींना तत्काळ उपचारासाठी वन विभागाने सहाय्य करावे. जंगल परिक्षेत्रात शेत असणाऱ्यांना शेतीपीकांसाठी विहिर तसेच बोअर करण्यासाठी परवानगी देण्यात यावी.

१०० दिवस कृती विकास आराखड्यांतर्गत मेळघाट क्षेत्रातील वझ्झर, घटांग, सलोना, भवई, सेमाडोह, माखला, चिखली, तारुबांधा, बोरी, केशरपूर, कारा या गावांना भेटी देऊन तेथील ग्रामस्थांच्या अडचणी व समस्या जाणून घेण्यात आल्यात.विभागीय आयुक्तांची शंकरबाबा पापडकरांच्या बालसुधारगृहास भेटमेळघाट क्षेत्रातील गावांना भेट या कार्यक्रमांतर्गत प्रारंभी विभागीय आयुक्तांनी वझ्झर येथील ग्राम पंचायत आणि पद्मश्री शंकरबाबा पापडकर यांच्या स्व.अंबादासपंत वैद्य मंतिमंद, मुकबधीर बेवारस बालसुधारगृहास भेट दिली व मतीमंद मुला-मुलींशी संवाद साधून आस्थेवाईपणे विचारपूस केली. यावेळी शंकरबाबा पापळकर यांनी बाल सुधारगृहातील १८ वर्षावरील अनाथ मुलांना कायमचे पालकत्व व पूनवर्सन होण्याचा कायदा होण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न व्हावेत, अशी मागणी केली. यासंबंधी राज्यभवन येथे बैठक लावून सकारात्मक निर्णय होण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही विभागीय आयुक्तांनी यावेळी दिली.

# हिंगणगाव येथील जिल्हा परिषद गुणवंत विद्यार्थ्यांची होणार 'विमानवारी'

## सरपंच दुर्गाबक्षसिंह ठाकूर यांनी प्रज्ञावंत विद्यार्थिनींचा गुण गौरव केला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २२ धामणगाव रेल्वे**

जिल्हा परिषद अंतर्गत गुणवंत विद्यार्थ्याची मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी घेतले व विद्यार्थी मराठी नववर्षाची पर्वा दिल्लीचीवारी घडणार आहे. दिनांक २५ ते २७ दरम्यान उमेदवार २८ विद्यार्थी झुक गाडीचा प्रवास करत आहे. मार्च २०१५ पासून दिल्लीतील विद्यार्थी आहेत. दिपाप्रसिद्ध सिंगल विमानाने नागपूर मार्गे अमरावती परत करणार आहेत आणि सरपंच दुर्गाबक्ष ठाकूर त्यांनी विद्यार्थिनींचा शनिवार (ता.२२) जावून गुण गौरव केला.



शिष्यवृत्ती परीक्षा, एन.एन.एम.एस परीक्षा, माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत विविध गुणवंतांची निवड या सहलीसाठी करण्यात आली. चौदा पंचायतीमधील प्रत्येकी दोन पालकांची या सहलीसाठी निवडण्यात आली आहे. यात हिंगणगाव जिल्हा परिषद सदस्य सहाव्या संतोष वर्गात सर्व प्रा तीरमारेदेवश्री, मोहन हराले निवडणे आहे. संकल्पनेतून जिल्हा निवडणुकीच्या तालीमनी विविध तालुक्यांमध्ये यश संपादन केले. त्या यशाची पावती म्हणून दिल्लीची विमाने ही ग्रामीण प्रज्ञावंत विद्यार्थ्याला जिल्हा माहितीची अनोखा भेट आहे.

दरम्यान दुर्गाबक्षसिह ठाकूर सरपंच तीमारे,देव हरा या दोन्ही विद्यार्थिनींचा गुण गौरव केला आणि शिक्षकांचे आभार. अध्यक्ष जितेंद्र शेंडे, मुख्याध्यापक मोहन देशमुख, शिक्षक वसंत वानिक, रविकांत पवार विजय ब्राह्मण, रंजना मेंढे, प्रगती तिजारे, अश्विनी जुमळे, सविता तीरमारे व आदि उपस्थित होते.

२५ मार्च रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्रशासकीय संजिता महापात्र सहलीला हिरवी झेंडी खर्च होत आहे. रेल्वे प्रवास करून सर्व विद्यार्थी दिल्ली येथे आहे. तीन दिवस व दोन रात्र सहल वजा पर्यटन दिल्लीचा ऐतिहासिक आणि विविध अंगांनी अभ्यास करून परत दिल्ली ते नागपूर विमान प्रवास करणार आहे.या सहलीत दिल्लीतील विविध क्षणीय, राष्ट्रीय कलाकारे, ऐतिहासिक व प्रस्थापित वास्तू भेटी खर्च आहे. राष्ट्रपती भवन, लाल किल्ला, संसद भवन, राजघाट, कुतुबमिनार अश्या प्रसिद्ध स्थळ दिल्लीतील काही शाळांना हे विद्यार्थी भेट देतात. खूप एवढ्या मोठ्याने दिल्लीवारी करण्याची ही पहिलीच वेळ आहे.

# नृत्य, खेळ, स्पर्धा अन चविष्ट भोजनाची मेजवानी

## जागर स्त्री शक्तीचा या वैदर्भी महोत्सवाचे आज उद्घाटन, उद्या भारत गणेशपुरे यांची हास्य मैफल, २५ मार्चपर्यंत सायन्यकोर मैदानावर विविध कार्यक्रम




ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता समूहातील महिलांचे जीवनमान उंचावणे, त्यांचे सबलीकरण करणे व उपजीविका आधारित उपक्रम राबविण्याकरिता दरवर्षी अशा प्रदर्शनीचे आयोजन केले जाते. या प्रदर्शनीतील उत्पादीत वस्तु व खाद्य पदार्थ आता नावलौकिक होत असताना नागरीकांना देखील तेवढीच प्रतिक्षा असते. त्यामुळे या प्रदर्शनीला भेट द्यावी.

**संजिता महापात्र,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती,**

नृत्य, खेळ, स्पर्धा, महिलांकरिता प्रशिक्षण कार्यशाळा अन वैदर्भीय चविष्ट भोजनाची मेजवानी 'जागर स्त्रि शक्तीचा या वैदर्भी महोत्सवादरम्यान चाखायला मिळणार आहे. या जिल्हास्तरीय प्रदर्शनीचे शनिवारी सायन्यकोर मैदानावर उद्घाटन होणार आहे. २५ मार्च पर्यंत आयोजित या महोत्सवा अंतर्गत रवीवारी सिनेअभिनेता भारत गणेशपुरे यांची हास्य मैफल रंगणार आहे.त्यामुळे या महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा ग्रामिण विकास यंत्रनेच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख यांनी केले आहे.ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता समूहातील महिलांचे जीवनमान उंचावणे त्यांचे सबलीकरण करणे व उपजीविका आधारित उपक्रम राबविणे या करिता उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून स्वयं सहाय्यता समूहांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी २२ ते २५ मार्चदरम्यान वैदर्भी महोत्सव जिल्हा विक्री प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे.



या प्रदर्शनीमध्ये अमरावती जिल्ह्यातील १०५ स्वयं सहाय्यता समूहाचे स्टॉल लावण्यात येत आहे. या प्रदर्शनीमध्ये ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता समूहाद्वारे उत्पादित ग्रामीण भागातील रुचकर खाद्य पदार्थ तसेच कलाकुसरीच्या स्वयं सहाय्यता समूहाद्वारे उत्पादित वस्तू विक्री करिता ठेवण्यात आले आहे. याअंतर्गत महिला विविध प्रशिक्षण ज्यामध्ये मायक्रोन पासून वस्तू तयार करणे, ज्वेलरी आर्ट प्रशिक्षण, बांबू क्राफ्ट प्रशिक्षण, दिव्यांग स्वयं सहाय्यता समूह यांच्या करिता उद्योजकता विकास व कौशल्य विकास प्रशिक्षण, फोटोग्राफी व्हिडीओग्राफी, रेशीम ज्वेलरी, मेहंदी आदी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. सोबतच सांस्कृतिक व मनोरंजन कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. तसेच दर्जेदार उत्पादनासह सुंदर हस्तकला आणि ग्रामिण भागातील चवीचा अनोखा स्वाद येथे चाखायला मिळणार आहे.

# माथाडी कामगारांच्या प्रश्नावर विधानसभेत आमदार प्रताप अडसड आक्रमक

## मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत येणाऱ्या अटी शर्ती मध्ये शिथिल करण्याची केली मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२धामणगाव रेल्वे**

महाराष्ट्र विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनात माथाडी कामगारांच्या प्रश्नावर विधानसभेत आमदार प्रताप अडसड आक्रमक झाल्याचे दिसून आले.गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्याला सक्तीच्या रजेवर पाठवा संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करून एसआयटी अंतर्गत चौकशी लावण्याची मागणी केली होती.त्यावर कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी एसआयटीलावण्याची विधानसभेत घोषणा केली.मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत येणाऱ्या अटी शर्ती मध्ये शिथिल करण्याची केली मागणीही आमदार अडसड यांनी केली विधानपरिषदचे विधेयक क्रमांक ३ वरती बोलताना आमदार प्रतापदादा अडसड यांनी माथाडी कामगारांच्या प्रश्नावर विधानसभेत आमदार प्रताप अडसड आक्रमक होत,एसआयटी लावण्याची केली मागणी केली.माथाडी कामगार मंडळ अंतर्गत होत



असलेल्या चुकीच्या प्रक्रिया व व्यवहाराच्या समस्यांवरती विधान सभेमध्ये आमदार प्रताप अडसड यांनी प्रश्न उपस्थित केले.तसेच गैरव्यवहार करणाऱ्या दाभाडे नावाच्या अधिकाऱ्याला सक्तीच्या रजेवर पाठवा संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करून एसआयटी अंतर्गत चौकशी लावण्याची मागणी केली होती.त्यावर कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी एसआयटीलावण्याची विधानसभेत घोषणा केली. तसेच मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत येणाऱ्या अटी शर्ती मध्ये शिथिलता करून रुग्णांना सहकार्य करण्यात यावे.अशी मागणी आमदार प्रताप अडसड यांची अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली आहे.त्यामुळे एक कर्तव्यदक्ष व जागरूक आमदार म्हणून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# धामणगावचे मुख्याधिकारी अमोल माळकर यांची बदली! नव्या मुख्याधिकारी पूनम कळंबे

## मुख्याधिकारी अमोल माळकर यांचा नगर परिषदे कर्मचाऱ्यांतर्फे सत्कार ; प्रशासन केले होते गतिमान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २२ धामणगाव रेल्वे**

येथील नगर परिषदेचे मुख्याधिकारी अमोल माळकर यांची गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा येथील नगर परिषदेत बदली झाली असून, त्यांच्या जागी वर्धा जिल्ह्यातील सेलू नगर परिषदेच्या मुख्याधिकारी म्हणून पूनम कळंबे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.दरम्यान मुख्याधिकारी अमोल माळकर यांना येथील नगर परिषदे कर्मचाऱ्यांतर्फे निरोप देवून त्यांचा सत्कार करण्यात आला.



या निरोप व सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी लेखापाल आशिष जोशी हे होते.तर व्यासपीठावर मुख्याधिकारी अमोल माळकर,नगर अभियंता शेखर ढबाले,प्रदीप सहारे,शिक्षण प्रशासन अधिकारी उमेश गोंडीक, नगर परिषद शिक्षक संघाचे केंद्रीय अध्यक्ष नरेंद्र चौधरी व आदी उपस्थित होते.

येथील नगर परिषदेचे मुख्याधिकारी अमोल माळकर यांची गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा येथील नगर परिषदेत बदली झाली आहे.त्यामुळे मुख्याधिकारी अमोल माळकर यांना येथील नगर परिषदेतर्फे निरोप देवून त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी कर निरीक्षक पंकज इंगळे,लेखा निरीक्षक मनोज भालेराव,संगणक अभियंता प्रशांत घुमनार,नगर रचनाकार रवी हिरुळकर,शोभा ढवळे,आरोग्य निरीक्षक आकाश सोनेकर,विजय कोकाटे,जयकुमार पांडे, युनूस खान,भरत इंदुरकर, सईद खान व आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# राष्ट्रवादी नेते आमदार-संजय खोडके यांचे अमरावतीत प्रथम आगमन निमित्य जंगी स्वागत

## विदर्भाच्या विकासाची श्वेतपत्रिका तयार करून कसोशीने प्रयत्न करू – आ. संजय खोडके





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने महाराष्ट्र विधानपरिषदेवर काम करण्याची संधी देवून सर्वसामान्य कार्यकर्त्याचा सन्मान केला आहे. ही सर्व संधी मिळत असतांना अमरावतीमधील तमाम स्नेहीजन,सहकारी व सर्वसमावेशक जनतेची साथ व पाठबळ लाभले आहे. माझ्या गेली ३५ वर्षाच्या विधीमंडळ व मंत्रालयीन कामकाजाचा अनुभव या सर्वाचा उपयोग आपण विधान मंडळात जनतेचे सामाजिक, आर्थिक प्रश्न तसेच विकासाचे प्रश्न मांडण्यासाठी करणार आहोत. प्रामुख्याने विदर्भाच्या विकासाच्या दृष्टीने एक विकासाची श्वेत पत्रिका तयार करून महायुती सरकारच्या माध्यमातून सर्व प्रश्न सोडविण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणार असल्याचा मनोदय नवनिर्वाचित आमदार-संजय खोडके यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र विधानपरिषदेचे नवनिर्वाचित आमदार-संजय खोडके यांचे शनिवारी सकाळी ७.५० वाजता मुंबईहुन अंबा एक्सप्रेसने अमरावती मॉडर्न रेल्वे स्थानकावर आगमन होताच सर्व सहकारी व स्नेहीजणांनी त्यांच्या स्वागतासाठी एकच गर्दी केली. विदर्भाच्या राजकारणात एक अग्रणी नेता म्हणून सर्वानाच सुपरिचित आ.संजय खोडके यांचे आमदारपदाची शपथ घेतल्यानंतर प्रथमच अमरावती येथे आगमन झाल्याने त्यांचे स्वागत व अभिनंदन करण्यासाठी सर्वांना उत्सुकता व लगबग दिसून आली. यावेळी आ. संजय खोडके यांनी सर्वाप्रती आभार मानून कृतज्ञता व्यक्त केली.महाराष्ट्र विधान परिषदेच्या रिक्त जागेसाठी झालेल्या पोट निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा पवार गटाच्या वतीने विदर्भातील नेते संजय खोडके यांना उमेदवारी देवून आमदारकी बहाल करण्यात आली. शुक्रवारी २१ मार्च रोजी संजय खोडके यांनी राज्य विधीमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात हजेरी लावून पद व गोपनीयतेची शपथ घेऊन कामकाजाला सुरुवात केली. दरम्यान आज शनिवारी २२ मार्च रोजी त्यांचे मुंबईहुन अमरावती येथे प्रथमच शहरागमन होताच जंगी स्वागत करण्यात आले. त्यानंतर रेल्वेस्टेशन चौक स्थित आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांच्या जनसंपर्क कार्यालय येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते संजय खोडके यांच्या आमदारकीचा जल्लोष करण्यात आला. ढोल ताश्याच्या गजरात, डीजेच्या तालात , गुलालाची उधळण व पुष्पांचा वर्षाव करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी नवनिर्वाचित आ.संजय खोडके यांचे स्वागत , अभिनंदन व सत्कार करण्यासाठी सर्वच क्षेत्रातील मान्यवर , सहकारी व स्नेहीजनांची एकच गर्दी दिसून आली.

# मिनी मंत्रालयात सोमवारी बजेट सादर होणार

## तिसऱ्यांदाही प्रशासकांनाच संधी २६ कोटींचे बजेट सादर होण्याची शक्यता






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

जिल्हा परिषदेत सलग दोन वर्षांपासून सीईओ अर्थसंकल्प सादर करीत असताना यंदा देखील सीईओंनाच प्रशासक म्हणून अर्थसंकल्प सादर करण्याची संधी मिळणार आहे. सोमवार, २४ मार्च रोजी दुपारी १२ वाजता जिल्हा परिषदेच्या सभागृहात सीईओ संजिता महापात्र ह्या २०२४-२५चे सुधारीत व २०२५-२६ चे प्रस्तावित अर्थसंकल्प सादर करणार आहेत. यंदा मागील वर्षीच्या तुलनेत ४ कोटींनी म्हणजे २६ कोटींचा अर्थसंकल्प सादर होण्याचीशक्यता आहे.जिल्हा परिषद निवडणुकीचा मुहूर्त ठरत नसल्याने तीन वर्षापासून प्रशासक म्हणून सीईओ कामकाज सांभाळत आहेत. मार्च महिन्यात सर्वांचे लक्ष अर्थसंकल्पाकडे लागते. पदाधिकारी व सदस्य नाही. परिणामी, यंदाही झेडपीच्या अर्थसंकल्पाची धुरा मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासकांकडेच राहणार आहे. वित्त व लेखाविभागात अर्थसंकल्प तयार करण्याची लगीनघाई सुरू झाली आहे. मागील वर्षी २२ कोटींचे बजेट सादर करण्यात आले होते. यंदा २०२५-२६ या आर्थिक वर्षात २६ कोटींचे बजेट राहणार असल्याची शक्सता आहे. याचा मुहुर्त ठरला असून सोमवारी २४ मार्च रोजी दुपारी १२ वाजता सभागृहात सीईओ संजिता महापात्र अर्थसंकल्प सादर करणार असून,सभेत मंजुरीवर शिक्कामोर्तब केले जाणार आहे. बजेटमध्ये शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास व शेती केंद्रबिंदू मानून कामकाज करण्यास प्रशासकाची प्राथमिकता आहे. या अर्थसंकल्पात शिक्षण, आरोग्य, शेती, ग्रामविकास व अन्य महत्त्वाच्या घटनांना प्राधान्य देण्यासोबतच भरीव तरतुदीची अपेक्षा व्यक्त होत आहे. याशिवाय शालेय विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण,महिला व मुलींना सक्षमीकरणासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यास प्राधान्य देण्याची शक्यता आहे. समाजकल्याण विभाग, दिव्यांग कल्याण, महिला व बालकल्याण विभागाकडून विशेष उपक्रम राबविण्यात येतात, त्यासाठीही तरतूद राहणार आहे. जिल्हा परिषदेच्या आगामी अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर वित्त विभागात धामधूम पहायला मिळत आहे.

# शॉट सर्किट मुळे आग; दोन एकरातील गहू पीक जळून खाक

## कलमखार शेतशिवारातील घटना





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२धारणी**

धारणी तालुक्यातील कलमखार गाव शेतशिवारातील काढणी करीता उभ्या असलेल्या गहू पिकाला शेतातून गेलेल्या ३३ केवी विद्युत लाईनवर शॉट सर्किट झाल्यामुळे अचानक आग लागल्याने शेतकऱ्यांचे दोन एकरातील गहू पीक पूर्णतः जळून खाक झाले आहे

कळमखार गावातील प्रतिष्ठित शेतकरी फुलचंद गुलाबचंद राठोड यांचा नातू अर्पित राठोड याने आपल्या वडीलोपार्जित पाच एकर शेतीत गहू पिकाची पेरणी केली होती ते उभे गव्हाचे पीक काढणी करून घरी आणणे बाकी असताना शेतातून गेलेल्या ३३ केवी विद्युत लाईन वर अचानक शॉर्टसर्किट झाले त्या शॉर्टसर्किटमुळे पाच एकरापैकी दोन एकर मधील गहू पीक पूर्णतः जळून खाक झाले याची माहिती परिसरातील शेतकऱ्यांना मिळताच त्यांनी आग विझण्या ची धडपड सुरू केली परंतु कडक उणात वाळलेल्या गहू पिकालां आगलेली आग विझत नसल्याने धारणी नगरपंचात चे अग्निशामक वाहन बोलविण्यात आले अग्निशामक वाहन पोहचे पर्यंत दोन एकरातील गहू पीक पूर्ण जळून खाक झाले होते उर्वरित तीन एकरातील गहू पीक वाचविण्यात धारणी नगरपंचायत च्या अग्निशामक वाहनाला यश मिळाले त्यामुळे दोन एकरातील शेत पिकाचे प्रचंड नुकसान झाले असून शेतकऱ्यांवर अचानक काळाने झडप घातल्या सारखाच प्रकार घडल्यामुळे त्याचा मोबदला प्रशासनाकडून देण्यात ची मागणी शेतकरी अर्पित राठोड यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# तळवेल फाटा ते तळवेल या रस्त्यावरील वाहचालकाची तारेवरची कसरत कधी थांबणार

## साहेब मुरूम तर टाकला परंतु आता मुरूम उखळल्यामुळे किरकोळ अपघात? तात्पुरती व्यवस्था नकोच नूतनीकरण करा गावाकऱ्यांची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ तळवेल चा.बाजार**

चांदूरबाजार ते अमरावती वलगाव मख्य महामार्गावर असलेल्या तळवेल फाटा ते तळवेल गावाममध्ये जाण्यासाठी एकमेव रस्त्या सध्या आपल्याला नूतनीकरणाची गरज असल्याचे सांगताना दिसत आहे तळवेल फाटा ते गाव या रस्त्याचे अंतर एकूण ३ किलोमीटर असून त्यातील जवळपास २ किलोमीटर चे नूतनीकरनाचे काम पूर्ण झाले असून जवळपास १ किलोमीटर रस्त्यात खड्डे की खड्यात रस्ते हेच समजत नाही रस्त्याचे काम कधी होणार! होणार की नाही? असा प्रश्न गावकऱ्यांना पडला आहे. काही दिवसाअगोदर बातमी प्रकाशित होताच साहेबाबा मुरूम टाकला परंतु काही दिवसातच मुरूम उखाल्याने किरकोळ अपघात होत आहे आता उन्हाळ्याची चाहूल लागली आहे आता काम करणार की भर पावसाळ्यात असा प्रश्न गावकऱ्यांना पडला आहे.

तळवेल फाटा ते गाव या रस्त्याचे एकूण अंतर ३ किलोमीटर असून दोन टप्प्यामध्ये जवळपास दोन किलोमीटर चे काम पूर्ण झाले परंतु तिसरा टप्पा मागील कित्येक वर्षांपासून नूतनीकरणाच्या प्रतीक्षेत आहे हा रस्ता जिल्हापरिषद बांधकाम विभागाच्या निगराणीत येत आहे मागील दोन ते तीन वर्षापासून जिल्हापरिषद व पंचायत समिती निवडणूक झाल्याचं नसल्याने प्रशासन राज सुरु असल्याने या रस्त्याकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरु आहे तालुक्याला व जिल्हाला जाण्यासाठी हा एकमेव रस्ता असल्याने या रस्त्यावर चांगलीच वर्दळ राहते त्यामुळे मागील काही दिवसांपासून किरकोळ अपघात होत आहे परंतु जिवीत हानी झाल्यास जबाबदार कोण? असा प्रश्न स्थानिक नागरिकांनी केला आहे

या मार्गावर तळवेल, जवळा, साहूर, लसूनापूर, कृष्णपूर, पूर्णानगर, परतवाडा, आसेगाव व इतर ठिकाणी जाण्यासाठी या रस्त्याचा वापर नागरिक करतात मोठमोठे खड्डे पडले असताना नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतअसल्याने डोकेदुखी वाढली आहे सुरवातीला रस्त्याचे काम जवळपास दोन किलोमीटर पूर्ण झाले परंतु १किलोमीटर अजूनही प्रतीक्षेत आहे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बबलूभाऊ देशमुख यांच्या प्रयत्नातून तीन पैकी दोन किलोमीटर चे काम पूर्ण झाले परंतु जिल्हा परिषद च्या निवडणूका झाले नसल्याने प्रशासक दुर्लक्षित करत आहे या रस्त्याचे नूतनीकरणाचे भविष्य अंधारात दिसत आहे

अचलपूर मदरसंघातील नवनियुक्त आमदार प्रवीण तायडे यांची जबाबदारी स्वीकारून या रस्त्याकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन काम पूर्ण करून देण्याची मागणी स्थानीक नागरिक करीत आहे रस्ताला गड्डे पडले असताना परिणामतः अनेक दुचाकी घसरत असल्याने किरकोळ अपघाताच्या घटना वाढत आहे. या मार्गावर अलीकडे वर्दळ वाढली आहे. परतवाडा जाण्यासाठी किंवा दर्यापूर मार्गावर जाण्यासाठी नागरिकांना या रस्त्याचा उपयोग करतात चांदुर बाजार तालुक्यातील हा रस्ताला जिल्हापरिषद बांधकाम विभाग नेहमीच सावंत्र मुलाचा दर्जा देत असतात आजूबाजूच्या गावातील शेतकऱ्यांचे शेत या रस्त्यावर आहे सध्या शेतामध्ये टरबूज खरबूज चे ओलिताचे कामे सुरु असल्याने रात्री बे रात्री शेतकऱ्यांना वीज आली म्हणजे जावे लागते अश्या परिस्थितीत रस्त्याची दुर्दशा झाल्याने मोठा मनस्ताप नागरिक व्यक्त करीत आहे. मागील कित्येक वर्षांपासून हा रस्ता चर्चेचा विषय ठरला आहे रस्त्या उखडल्याने संपूर्ण रस्त्यावर दगड उघळे पडल्याने या दगडामुळे रस्त्यावरून वाहने चालविणे कठिण जात आहे. परिणामतः अनेक दुचाकी घसरत असल्याने किरकोळ अपघाताच्या घटना वाढत आहे. मागील महिन्यामध्ये बातमी प्रकाशित होताच जिल्हा परिषद मार्फत तात्पुरती व्यवस्था करून मुरूम टाकण्यात आला परंतु आता मुरूम सुद्धा उखळल्याने मोठे मोठे दगड संपूर्ण रस्त्यावर पसरल्याने गाडी चालविन्यासाठी तारेवारची कसरत करावी लागत आहे.

# भाजप शिक्षक आघाडीच्या प्रदेश सहसंयोजकपदी चंद्रशेखर भोयर यांची नियुक्ती



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष व अमरावती विभागातील शिक्षक नेते चंद्रशेखर भोयर यांची भारतीय जनता पक्ष शिक्षक आघाडीच्या महाराष्ट्र प्रदेश सहसंयोजक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबई स्थित भाजप कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजप प्रदेशाध्यक्ष तसेच राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी चंद्रशेखर भोयर यांना नियुक्ती पत्र देऊन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी माजी मंत्री भाजप नेते संजय कुटे, अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे, भाजपचे प्रदेश प्रवक्ते विनोद वाघ आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी भाजप शिक्षक आघाडीचे नवनिर्वाचित प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर यांनी भारतीय जनता पक्षाचे तसेच विदर्भ संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, पश्चिम विदर्भातील भाजपा नेते आमदार संजय कुटे.माजी.मंत्री.डॉ.प्रवीण पोटे, आमदार रवी राणा, धामणगावचे आमदार प्रताप अडसड, आ.प्रवीण तायडे ,मेळघाटचे आमदार केवलराम काळे, मोर्शीचे आमदार उमेश यावलकर,तिवसाचे आमदार राजेश वानखडे,विधान परिषदेचे आमदार.दादाराव केचे.आमदार संदिप जोशी,प्रदेश उपाध्यक्ष अनिल गावंडे, अमरावती जिल्हा उपाध्यक्षा छायाताई दंडाळे, कॅबिनेट मंत्री आकाश फुंडकर, योगेंद्र गोडे, जिल्हा सरचिटणीस विवेक गुल्हाने, शहर जिल्हा सरचिटणीस चेतन पवार,डॉ.नितीन धांडे ,मंत्री जयकुमार रावल, मंत्री जयकुमार गोरे, नागपूरचे आमदार मोहन मते, कारंजाच्या आमदार सई डहाके, वाशिमचे आमदार खोडे, अकोल्याचे आमदार रणधीर सावरकर, मूर्तिजापूरचे आमदार हरीश पिंपळे, काटोलचे आमदार चरणसिंग ठाकूर, यांच्यासह भाजपचे सर्व ज्येष्ठ नेते, मंत्री, आमदार सोबतच अमरावतीचे स्थानिक नेते, भाजप प्रदेश सहसंयोजक दिनेश सूर्यवंशी, प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी, प्रदेश सचिव जयंत डेहनकर, तसेच अमरावती विभागातील आणि शहर व जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. सदर नियुक्ती बद्दल चंद्रशेखर भोयर यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

**शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी लढणार: भोयर**

भारतीय जनता पक्षाने प्रदेश सहसंयोजक पदाची मोठी जबाबदारी माझ्यावर सोपविली असून वरिष्ठ नेत्यांच्या विश्वासाला तडा जाऊ न देता या पदाला निश्चितपणे न्याय देण्याचा प्रयत्न करेल. पक्ष संघटन वाढीसाठी आणि शिक्षक बांधवांच्या न्याय हक्कासाठी तसेच त्यांच्या सेवा संरक्षणासाठी अहोरात्र काम करून त्यांच्यासाठी लढणार, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मदतीने राज्यातील शिक्षकांचे प्रश्न सोडविण्याचा आणि ते मार्गी लावण्याचा प्रयत्न करणार सोबतच संपूर्ण राज्यात भाजप शिक्षक आघाडीचे जाळे विणून शिक्षकांची मोठी फळी उभारणार.पक्षाचे विचार घराघरात पोहोचवून पक्ष वाढीसाठी जोरकस प्रयत्न करणार अशी प्रतिक्रिया भाजप शिक्षक आघाडीचे नवनिर्वाचित प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर यांनी याप्रसंगी दिली.